**सुविचार**

जर तुम्हाला काहीतरी नवीन करायचे असेल, तर अपयशी होण्याची भीती सोडून द्या.

- स्वामी विवेकानंद

आपला आवाज आपली शक्ती

# जनशक्ति

जळगाव येथून प्रकाशित होणारे निष्पक्ष, निर्भीड दैनिक

**अंतरंग**

- जळगाव जिल्हा - जळगाव बाजार समितीचे कामकाज ठप्प
- दृष्टीकोन - कंत्राटांची खैरात
- जीवनशक्ती - नियमित योगा करण्याचे फायदे
- जनशक्ति विशेष - महापरिनिर्वाण दिनानिमित्त...

epaper.janashakti.in » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ » वर्ष : ७३ » अंक : ७० शनिवार, ६ डिसेंबर २०२५ » जळगाव/नाशिक/धुळे/नंदुरबार » पाने ६ » किंमत : २ रुपये

## शॉर्ट न्यूज

### निजामपूर पोलिस ठाण्यातील दोघे हवालदार तडकाफडकी निलंबित

**धुळे ।** निजामपूर पोलिस ठाण्यात कार्यरत दोन्ही हवालदारांनी तब्बल २०० हून अधिक गुन्ह्यांमधील मुद्देमाल गहाळ केल्याने दोघा कर्मचार्यांना धुळे जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धीवरे यांनी निलंबित केले आहे. या कारवाईने पोलिस वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. महेंद्र जाधव व शरद ठाकरे अशी निलंबित हवालदारांची नावे आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार निजामपूर पोलिस ठाण्यात महेंद्र जाधव व शरद ठाकरे हे हवालदार कार्यरत असताना त्यांनी २०० हून अधिक गुन्ह्यांतील किंमती मुद्देमाल गायब केला. त्यांना वारंवार सूचना करूनही त्यांनी मुद्देमालाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही.

### दीपनगरचे सेवानिवृत्त अभियंता बावस्कर यांना पीएच.डी



**भुसावळ ।** दीपनगर वीजनिर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता राजेंद्र बावस्कर यांना चेन्नई येथे मानद पीएचडी (डॉक्टरेट इन ॲडमिनिस्ट्रेशन) बहाल करण्यात आली. साउथ वेस्टर्न युनिव्हर्सिटी द्वारा डॉक्टरेट इन ॲडमिनिस्ट्रेशन या विषयावर आर.आर.बावस्कर यांना चेन्नई येथे मानद पीएचडी मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रदान करण्यात आली. एमएसईबी सेवेत असताना सहाय्यक अभियंता या पदावर रुजू होऊन-उपकार्यकारी अभियंता-आपल्या गुणवत्तेवर कार्यकारी अभियंता पदोन्नत होऊन-मुख्य अभियंता म्हणून सेवानिवृत्त झालेले आहेत.

# सौरपंपासाठी १० हजार कोटींचे कर्ज मंजूर !

**संभाजीनगरातील कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती, १० लाख सौर पंपाचे उद्दिष्ट**

। छत्रपती संभाजीनगर ✍ ।

पुढील वर्षी १० लाख सौर कृषी पंप बसवण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले जाईल. शेतकऱ्यांसाठी वेगळी सौर ऊर्जा तयार होत असून, एकूण १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती प्रकल्पांपैकी ३ हजार मेगावॅटचे प्रकल्प साकार झाल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौर ऊर्जेसाठी १० हजार कोटींचे कर्ज मंजूर झाल्याची माहिती येथे दिली. १६ हजार मेगावॅट निर्मिती सौर ऊर्जेतून पर्यावरणाची हानी थांबणार असून, शेतकऱ्यांना पुढील २५ वर्षे विजेचे बिल लागणार नाही. २४ तास पाणी मिळणार असल्याने तीन पीकं घेण्याची सोयही होणार असून, ग्रामीण भागात १ लाख रोजगार निर्मिती होणार असल्याचा दावाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. महाराष्ट्रामध्ये एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप बसवण्याच्या उच्चांकाचा जागतिक विक्रम झाला असून, त्याची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे. त्यानिमित्त प्रमाणपत्र देण्याच्या सन्मान सोहळ्यात मुख्यमंत्री शुक्रवारी येथे बोलत होते. शेंद्रा औद्योगिक वसाहतीमधील ऑरिक सिटी कार्यालयाच्या आवारात पार पडलेल्या कार्यक्रमाच्या मंचावर गिनीज बुकचे परीक्षक कार्ल्स सॅबील, अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव आभा



शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, आदित्य जीवने आदींसह ऊर्जा विभागाचे प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. गिनीज बुकमध्ये नोंद झालेल्या ४५ हजार ९११ सौरकृषी पंपापैकी २७ हजार मराठवाड्यातील तर एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ हजारपेक्षा अधिक सौरपंप बसवण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### कुसूममध्ये ६५ टक्के योगदान

» **केंद्राच्या** कुसूम योजनेत साडे नऊ लाख पंप मंजूर असून, त्यात एकट्या महाराष्ट्राने सात लाख पंप लावून दाखवले असून, हा वाटा ६५ टक्के असल्याचा दावाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

### वीजदर प्रत्येकवर्षी कमी होणार

» **महाराष्ट्र** पुढील पाच वर्षांत प्रत्येक वर्षी विजेचे दर कमी करणार आहे, असे नियामक आयोगाला सांगितले आहे. ९ टक्क्यांनी वाढणारा विजेचा भाव ३ टक्क्यांनी प्रत्येक वर्षी कमी करणार असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

# कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत

**सुप्रीम कोर्टाचे निर्देश, निवडणुका वेळेतच पूर्ण होणार**

**नवी दिल्ली ।** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांवर अखेर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत स्पष्ट आदेश दिले आहेत. राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने सांगितले. कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश देत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेवरील अनिश्चिततेला पूर्णविराम दिला.

२ डिसेंबरला झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले. २१ तारखेपूर्वी मतमोजणी घेण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. उच्च न्यायालयांमधील विविध याचिकांचा,



प्रकरणांचा किंवा खंडपीठांच्या आदेशांचा परिणाम होऊन निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत, याची विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. नागपूर, औरंगाबाद खंडपीठ किंवा मुंबई उच्च न्यायालय असेल, त्यांच्या कोणत्याही आदेशाचा परिणाम निवडणुका लांबण्यावर होऊ नये, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले.

### पुढील निवडणूकाही वेळेतच होणार

» **गेल्या** काही वर्षांपासून अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विविध कारणांमुळे पुढे ढकलल्या जात होत्या. यामुळे नागरिकांमध्ये तसेच जनप्रतिनिधींमध्येही प्रचंड अस्वस्थता आणि संभ्रम निर्माण झाला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या आदेशामुळे आता ही भीती संपुष्टात आली आहे. या आदेशामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला स्पष्ट दिशा मिळाली असून, निवडणुका पुन्हा अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडणार नाहीत, याचा भरोसा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने दिलेली वेळमर्यादा काटेकोरपणे पाळावी, उच्च न्यायालयांनी निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि स्थानिक संस्थांच्या निवडणुका वेळेत पार पडाव्यात, या मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

## फवारणीचे औषध पाणी चूकून पिल्याने मजुराची प्रकृती गंभीर

। यावल ✍ प्रतिनिधी।

**यावल** शहरातून चोपड्याकडे जाणार्या रस्त्यावर कृष्णा चव्हाण यांच्या शेतात एका ५२ वर्षीय शेतमजुराने शेतात काम करत असताना त्याला तहान लागली असता चुकून एका प्लास्टिकच्या कॅन मध्ये फवारणीचे औषध मिसळलेले पाणी प्राशन केल्याने त्याची प्रकृती बिघडली. त्याच्यावर यावल ग्रामीण रूग्णालयात प्रथमउपचार करून जळगाव हलवण्यात आले. यावल शहरातील शेतकरी कृष्णा चव्हाण यांचे यावल चोपडा रस्त्यावर शेत आहे. त्यांच्या शेतात कामासाठी बुधवारी जीवन यशवंत मेघे (५२, रा.सांगवी बुद्रुक, ता.यावल) हे शेतमजुर मजुरी करतात. त्यांना तहान लागल्याने ते पाणी पिण्यासाठी झाडाखाली गेले. तेथे असलेल्या एका प्लास्टिकच्या कॅन मध्ये फवारणीचे औषध पाण्यात निश्चित करून ठेवले होते. त्यांनी ते चुकून प्राशन केले. हा प्रकार निर्दशनास येताचं त्यांना तातडीने यावल ग्रामीण उपचाराकरिता दाखल केले. डॉ.गौरव भोईटे, अधिपरिचारीका मंजुषा कोळेकर, बापू महाजन यांनी त्यांच्यावर प्रथमोपचार केले. त्यांची प्रकृती खालावत असल्याने त्यांना पुढील उपचाराकरिता जळगाव जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यांची प्रकृती गंभीर आहे.

# यावल : स्ट्राँग रूमला प्रशासनसह उमेदवारांकडून २४ तास पहारा

**मोबाईल जामर लावण्याची मागणी : सीसीटीव्हीची करडी नजर**

। यावल ✍ प्रतिनिधी।

**यावल** नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदान प्रक्रिया पार पडली आणि आता मतमोजणी ही २१ डिसेंबर रोजी होणार आहे. संपूर्ण ईव्हीएम यंत्र सील करून यावल येथील तहसील कार्यालयाच्या स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आले आहे. या ठिकाणी प्रशासनाकडून २४ तास पहारेकरी तसेच सीसीटीव्ही कॅमेर्याची नजर असतांनादेखील शिवसेना उबाठाच्या उमेदवारासह भाजपच्या उमेदवाराकडून या ठिकाणी २४ तास पहारा देण्यासाठी पाच जण नियुक्त करण्यात आले. तशी परवानगीदेखील तहसीलदारांकडून त्यांनी घेतली. या परिसरात मोबाईल जामर लावण्याची मागणी करण्यात आली आहे. यावल पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाकरिता चार तर नगरसेवकांच्या २२ जागांसाठी ७४ उमेदवार रिंगणात होते. यात मंगळवारी मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.

### भाजपाकडूनही पहारा

» **भारतीय** जनता पार्टीच्या उमेदवार रोहिणी उमाकांत फेगडे यांच्या वतीने देखील या ठिकाणी पहारा देण्यासाठी दोन लोक ठेवण्यात आले आहे. २४ तास या ठिकाणी प्रशासनासह उमेदवारांच्या वतीने देखील पहारा दिला जात आहे. येत्या २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. तोपर्यंत हा पहारा या ठिकाणी कायम ठेवला जाणार आहे. माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना उबाठाचे उमेदवार अतुल पाटील यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांच्याकडे निवेदन देत तहसील कार्यालयाच्या या स्ट्राँग रूम सह परिसरात मोबाईल जामर लावण्याची मागणी केली. या भागामध्ये इंटरनेट देखील नियमित बंद ठेवले जावे, अशी त्यांची मागणी आहे.



ईव्हीएम यंत्र हे सील करून यावल शहरातील सातोद रस्त्यावर असलेल्या तहसील कार्यालयामध्ये सुरक्षित ठेवण्यात आले. या स्ट्राँग रूमला प्रशासनाकडून पहारा लावण्यात आला असलातरी येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उमेदवार छाया अतुल पाटील यांच्या वतीने तीन लोकांची अधिकृतरित्या या ठिकाणी पहारा देण्यासाठी परवानगी घेण्यात आली. हे तीन लोक हे येथे २४ तास पहारा देत आहे.

### भूमिअभिलेख कर्मचाऱ्याला १.५ लाखांची लाच घेताना अटक

**अहिल्यानगर ।** भूमी अभिलेख कार्यालयातील भूकरमापक अजयभानसिंग गुलाबसिंग परदेशी (वय ४८, नियुक्ती नेवासा भूमीअभिलेख, उपअधीक्षक कार्यालय, रा. भानोदय बंगला, जनरल अरुण वैद्य कॉलनी, जामखेड रस्ता, अहिल्यानगर) यांना नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने १.५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना अटक केली. या घटनेची पार्श्वभूमी अशी, पाथरवाला गायगव्हाण (ता. नेवासा) शिवारात तक्रारदार, त्याचे भाऊ, वडील व इतर शेतकऱ्यांची शेती आहे. तेथे जाण्यासाठी शिवरस्त्यावर अतिक्रमण असल्याने तक्रारदाराचे भाऊ व इतर शेतकऱ्यांनी शिवरस्ता खुला करण्यासाठी नेवासा तहसीलदारांकडे ३१ जानेवारी २०२२ रोजी अर्ज केला होता. त्यावर तहसीलदारांनी मोजणी आदेश देऊन मोजणीचा खर्च अर्जदार शेतकऱ्यांनी भरावा असा आदेश दिला होता. या आदेशाविरुद्ध तक्रारदाराचे भाऊ व इतर शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात दावा दाखल केला. उच्च न्यायालयाने शिवरस्ता खुला करण्याकरता मोजणीसाठी येणारा खर्च अर्जदार शेतकऱ्यांकडून न घेता शासनाने करावा, असा आदेश दिला होता.

# सारंगखेडा अश्व बाजारात ११,११,१११ संख्येचे कुतूहल !

**यात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी ३५ घोड्यांच्या विक्रीतून २६ लाखाची उलाढाल**

। नंदुरबार ✍ प्रतिनिधी।

देश, विदेशात अश्व व्यापारासाठी प्रसिद्ध असलेल्या सारंगखेडा अश्व बाजाराला सुरुवात झाली आहे. या बाजारात दोन हजार ८०० अश्व विक्रीसाठी आले असून पहिल्याच दिवशी ३५ अश्वांच्या विक्रीतून २६ लाखांपेक्षा अधिकची आर्थिक उलाढाल झाली.


पहिल्याच दिवशी ११ लाख ११ हजार १११ रुपयांना एका अश्वाची विक्री झाली असून दौंड येथील आमदार पुत्राचे अश्वप्रेम या बाजारातून पाहण्यास मिळाले. सारंगखेड्याच्या बाजारात मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश , पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र अशा विविध प्रांतातून खरेदी-विक्रीसाठी दरवर्षी तीन हजारांहून अधिक अश्व दाखल होत असतात. पंजाब, सिंध, मारवाड अशा विविध जातीचे अश्व बाजारात पाहण्यास मिळतात.

अश्व विक्रेत्यांना उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या सुविधांमुळे देशात पुष्कर मेळ्यानंतर अश्व बाजारासाठी सारंगखेड्याचे नाव घेतले जाते. या बाजारात शेतकऱ्याला लागणाऱ्या अश्वापासून घोडागाडी ते थेट शर्यत आणि शौकिनांच्या स्टड फार्मची शोभा वाढविणारे असे विविध प्रकारचे अश्व खरेदी-विक्रीसाठी दाखल होतात. सारंगखेड्यात अश्व विक्री देशभरातील इतर बाजारांच्या तुलनेत चांगली होत असल्याने आणि त्यांना भावही चांगला मिळत असल्याने विक्रेते या बाजाराची आवर्जुन वाट पाहत असतात.

» **सारंगखेड्यानंतर** मालेगाव, अकलूज अशा ठिकाणी अश्व बाजार भरत असल्याने व्यापाराची साखळी निर्माण होत असल्याने अश्व मालक प्रथम सारंगखेडा येथे येतात. काही वर्षांपासून याठिकाणी चेतक फेस्टिव्हलच्या माध्यमातून अश्व बाजाराची प्रसिध्दी करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. यंदा



सारंगखेड्याच्या अश्व बाजारात आतापर्यंत २८०० अश्व विक्रीसाठी दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे दत्तजयंतीच्या पहिल्याच दिवशी या बाजारात ३५ अश्वांच्या विक्रीची नोंद झाली. त्यातही सर्वात जास्त किमतीला म्हणजेच तब्बल ११, ११, १११ रुपयांना एका अश्वाची विक्री झाली असून पुणे जिल्ह्यातील दौंडचे आमदार राहुल कुल यांचे पुत्र आदित्य यांनी हा अश्व खरेदी केला. आदित्यने खरेदी केलेली ही पंजाबच्या नुकरा जातीची घोडी असून ती २० महिन्यांची आहे. तिला राजस्थानातून विक्रीसाठी आणले होते. शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इतिहासात सर्वात महाग विक्री झालेला हा दुसरा अश्व असणार आहे. याआधी याठिकाणी १५ लाख रुपयांना अश्व विक्री झाल्याची नोंद आहे. एकंदरीत पहिल्या दिवसात जवळपास २६ लाखांहुन अधिकची उलाढाल पहायला मिळाली आहे. गेल्या वर्षी या बाजाराने जवळपास पावनेचार कोटींच्या उलाढालीचा टप्पा गाठला होता. यंदा पहिल्याच दिवशीचा आकडा पाहता यंदा सारंगखेड्याचा घोडे बाजार हा आपल्या उलाढालीचा विक्रम मोडीत काढले का याकडे साऱ्यांच्याच नजरा लागून राहणार आहे. विविध स्पर्धांसाठी देशभरातून अश्व दरम्यान, याठिकाणी चेतक फेस्टिव्हलच्या माध्यमातून भरवल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांसाठी देशभरातील नामवंत स्टड फार्म मालक आपले अश्व घेवून दाखल होत आहेत. यंदाच्या बाजारात अश्व विक्रीचा कोणता नवीन उच्चांक नोंदला जातो, याकडे अश्वप्रेमींचे लक्ष लागून आहे.



जनशक्ति
जीवनशक्ती
www.ejanshakti.com
जळगाव, शनिवार, ६ डिसेंबर २०२५ » पान २

# नियमित योगा करण्याचे फायदे



**शरीराला** तंदुरूस्थ ठेवण्यासाठी योग अत्यंत प्रभावी. नियमित योग केल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्य वाढते. आजकालच्या धावपळीच्या जिवनशैलीत तर, योगाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. तुम्ही शारीरिक आणि मानसिक त्रासांपासून दूर राहू इच्छित असाल तर, योग हा अत्यंत सोपा आणि फायदेशीर उपाय. म्हणूनच जाणून घ्या नियमित योगा करण्याचे फायदे.

### तणावापसून मुक्ती

नियमित योगा केल्याने मानसिक ताण तणाव कमी होण्यास मदत होते. सकाळी उठून तुम्ही जर प्राणायाम आणि मेडिटेशन करत असाल तर, पूर्ण दिवस तुम्हाला नक्कीच आनंद आणि उत्साही वाटेल.

### वृद्धापकाळात आरोग्याच्या समस्या टाळण्यासाठी

आपण तरूण असतो. तरूण असताना प्रकृतीही साथ देत असते. त्यामुळे शरीर कोणत्याही किरकोळ तक्रारी, आजाराशी झुंजायला तयार असते. पण, जसजसे वय वढू लागते तसतसे शरीरावर मयार्दा येतात. पण, तुम्ही जर सुरूवातीपासूनच योगा करत असाल तर, तुमची ही साधना वृद्धापकाळात कामी येऊ शकते. वृद्धापकाळात आरोग्याच्या तक्रारी कमी होण्यसाठी नियमित योगा करा.

### शरीरातील साखर नियंत्रण

आजकाल कमी वयातही मधुमेहाची लागण झालेले अनेक लोक आपल्याला पहायला मिळतील. शरीरातील इन्सूलीनची निर्मिती होण्याचे प्रमाण घटले की शरीरातील साखरेचे प्रमाण वाढते. अशा वेळी हे प्रमाण नियंत्रणात ठेवण्यासाठी योगा महत्त्वाची भूमिका पार पाढतो.

### वजन नियंत्रणासाठी महत्त्वाचे

वाढता स्थूलपणा हा तुमच्या कार्यक्षमतेवर मयार्दा घालतोच. पण, अनेक आजारांनाही निमंण देतो. म्हणून नियमित योगा करत चला. नियमित योगा करण्याने शरीरातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण नियंत्रणात राहते. परिणामी वाढत्या शारीरिक वजनाला मयार्दा पडतात.

### रक्ताभीसरण

योगामुळे शरीराच्या सर्व अवयवांना चांगला व्यायाम मिळतो. त्यामुळे शरीरातील रक्ताभिसरण वेगाणे होण्यास मदत होते. योगामुळे श्वासोच्छवास योग्य पद्धतीने घेतला जातो. त्यामुळे शरीरिरातील रक्ताभिसरण गतिमान होते.

दरम्यान, नियमित योगा करण्याचे फायदे असे आकडेवारीने मुद्देसुद सांगता येत नाही. त्याला मयार्दा पडतात. पण, तुम्ही नियमित योगा करून योगाचे असंख्य फायदे स्वतः अनुभवऊ शकता.

# शरीरातील फॅट कमी करण्यासाठी या ५ ड्रिंक्सचे सेवन करणे टाळा



शरीरातील फॅट वाढायला वेळ लागत नाही. दिवसभराच्या धावपळीत आपण योग्या आहार न घेता बाहेरचं खाणं पसंत करतो. रस्त्यावरच्या खाण्यात किंवा वेगवेगळ्या जंग फूडमध्ये फॅट असतात. पदार्थात तर फॅट असतातच त्याचबरोबर वेगवेगळ्या ड्रिंक्स मध्ये मोठ्या प्रमाणात फॅट आढळतात .शरीरात फॅटचे प्रमाण वाढणं म्हणजे घरबसल्या आजारांना आमंत्रण देण्यासारख आहे.

**शरीरातील फॅट कमी करण्यासाठी या ५ ड्रिंक्सचे सेवन करणे टाळा-**

- मलाई लस्सी
- म्हशीच्या दुधाचा वापर टाळावा
- कॉफी पिणं कमी करावं
- चॉकलेट मिल्कचे सेवन करु नये
- वेगवेगळे मिल्कशेक पिणं टाळावं

# घराच्या भिंतींवर या गोष्टी दिसत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नका

**वास्तुशास्त्रामध्ये** घरामध्ये ठेवलेल्या प्रत्येक वस्तूची दिशा आणि स्थिती निश्चित केली आहे, जी खूप महत्त्वाची आहे. असे मानले जाते की जर घरातील वस्तू वास्तुशास्त्रानुसार असतील तर घरात सकारात्मक ऊजेर्चा प्रवाह वाढतो. घरात ठेवलेल्या वस्तूंचा घराच्या वास्तूवरच परिणाम होत नाही, याशिवाय घराच्या भिंती आणि दरवाजे वास्तूनुसार नसतील तर त्याचा घरातील सदस्यांवरही वाईट परिणाम होतो. असे मानले जाते की घराच्या भिंतींमधून अशी काही चिन्हे आढळतात, ज्याचा परिणाम घराच्या सुख-शांतीवर होतो, त्यामुळे घराच्या भिंती सुरक्षित आणि सुसज्ज असणे खूप महत्वाचे आहे.

### भिंत कोणत्या दिशेला आहे

वास्तुशास्त्रात घराच्या भिंती कोणत्या दिशेला असाव्यात याचा उल्लेख आहे. घर बांधताना घराच्या भिंतींची उंची घराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उंचीपेक्षा तीन-चतुर्थांश जास्त असावी हे ध्यानात ठेवावे.

वास्तुशास्त्रात असेही सांगण्यात आले आहे की घराच्या पश्चिम आणि दक्षिण दिशांच्या भिंतींची उंची उत्तर आणि पूर्व दिशांच्या भिंतींपेक्षा कमीत कमी 30 सेमी जास्त असावी.

### घराच्या भिंती स्वच्छ ठेवा

वास्तुशास्त्रानुसार घराच्या भिंती नेहमी स्वच्छ ठेवल्या पाहिजेत. असे मानले जाते की कोळ्याचे जाळे, धूळ, घाणेरड्या भिंती नकारात्मक ऊर्जा वाढवतात. कोळ्याचे जाळे तणावपूर्ण आणि निराशाजनक वातावरण निर्माण करतात. याशिवाय घराच्या भिंतींवर कोणत्याही प्रकारचे डाग नसावेत, ते घरामध्ये गरिबी पसरवतात.


### भिंतींवर रंगांचे महत्त्व

वास्तुशास्त्रानुसार घराच्या आतील भिंतींवरील रंगांनाही विशेष महत्त्व असते, त्यामुळे घराच्या भिंतींचा रंग उडाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. असे मानले जाते की यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये अनेक प्रकारचे रोग उद्भवतात.

तसेच घराच्या भिंतींवर गडद निळा किंवा काळा रंग करू नये. घराच्या भिंतींमध्ये नेहमी हलके आणि सुंदर रंग वापरा. असे केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा वाढते. त्याचबरोबर घरातील सदस्यांमध्ये प्रेम आणि सद्भावना कायम राहते.



# सेकंदात फोटोंमधून मीम्स बनवा, गुगलचे 'हे' फीचर जाणून घ्या




**आज आम्ही तुम्हाला गुगलच्या एका फीचरविषयीची माहिती देणार आहोत. गुगल फोटोजच्या या फीचरच्या मदतीने युजर्स कॅमेऱ्याच्या मदतीने आपला गॅलरी फोटो किंवा नवीन फोटो कन्व्हर्ट करू शकतील आणि त्याला मीममध्ये रुपांतरित करू शकतील. इतकंच नाही तर हे फीचर युजर्सला त्यांच्या पसंतीचे मीम टेम्प्लेट निवडण्याची परवानगी देते. चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.**

तुम्हाला माहिती आहे की, गुगल नेहमी आपल्या युजर्ससाठी काही ना काही खास फीचर्स आणत असते. आता गुगल फोटोमध्ये तुम्हाला असेच काही खास मिळत आहे. तुम्ही गुगल फोटोजच्या या फीचरच्या मदतीने युजर्स कॅमेऱ्याच्या मदतीने आपला गॅलरी फोटो किंवा नवीन फोटो कन्व्हर्ट करू शकता. आता हे नेमके कसे काम करते, कसे वापरता येते आणि यातून आणखी कोणत्या गोष्टी करता येऊ शकतात, चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.



तुम्हाला मीम्स बनवण्याची आणि पाहण्याची आवड असेल तर गुगल तुमच्यासाठी एक उत्तम फीचर घेऊन येत आहे. गुगल फोटोजमधील या फीचरच्या मदतीने तुम्ही एका क्लिकवर कोणत्याही फोटोला मीममध्ये रुपांतरित करू शकता. या फीचरचे नाव मी मीम असे आहे. हे फीचर्स इनपुट प्रतिमेवर आधारित विविध प्रकारचे डिजिटल आर्ट-सारखे मेम टेम्पलेट्स तयार करू शकते.

### मीम्स फीचर्स

अँड्रॉइड अथॉरिटीच्या मते, गुगल फोटोज एका नवीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) फीचर्सवर काम करत आहे जे युजर्सच्या सेल्फीला मीममध्ये बदलेल. असे सांगितले जात आहे की हे नवीन फीचर्स अद्याप विकसनशील टप्प्यात आहे आणि लवकरच ते आणले जाऊ शकते. याशिवाय कंपनी जेमिनी ॲपच्या व्हॉइस मोड फीचरमध्ये सुधारणा करण्यावरही काम करत आहे. अँड्रॉइड अथॉरिटीने या फीचरच्या ऑनबोर्डिंग पेजचा स्क्रीनशॉटही शेअर केला आहे. त्याची माहिती अशी आहे की, ''स्वतः ला, आपले कुटुंब आणि मित्रांना आपल्या आवडत्या मीम्समध्ये बदला.'' फक्त एक टेम्पलेट, एक चित्र निवडा आणि आनंद घ्या - गट गप्पा आणि इतरत्र शेअर करण्यासाठी योग्य.''

### हे फीचर्स कसे कार्य करते?

या फीचरच्या मदतीने युजर्स आपल्या गॅलरीच्या मदतीने किंवा कॅमेऱ्याच्या मदतीने नवीन फोटो क्लिक करून त्याला मीममध्ये रुपांतरित करू शकतील. इतकेच नाही तर हे फीचर्स युजर्सना त्यांच्या आवडीचे मीम टेम्पलेट्स निवडण्याची परवानगी देखील देते.

फोटो आणि टेम्पलेट्स निवडल्यानंतर, ते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने एआय जनरेटेड मेम फोटो तयार करते. गुगलने अद्याप या फीचरला कन्फर्म केले नसले तरी बीटा टेस्टिंगनंतर लवकरच हे फीचर रोलआउट केले जाऊ शकते. आपण हे गुगल फोटो ५7.51.0 अद्यतनात पाहू शकता.

# सुतरफेणी

**साहित्य :** मैदा २ वाट्या, तूप २ वाट्या, मीठ अर्धा चमचा, साखर २ वाट्या

**कृती :** मैदा पाण्यात घट्ट भिजवून दोन-तीन तास ठेवावा. नंतर पाणी लावून, कुटून, त्याला चांगली तार आणावी. अर्धा चमचा मीठ घेऊन, मीठ चमचाभर पाण्यात विरघळल्यावर ते पाणी मैद्याला लावून मैदा पुन्हा चांगला कुटावा. नंतर त्याचे १०-१२ गोळे करून ठेवावेत. तूप परातीत घालून चांगले फेसावे. प्रत्येक गोळ्याला फेसलेले तूप लावून तो थोडा लांबवून ठेवावा. याप्रमाणे सर्व गोळ्यांना चार-पाच वेळा तुपाचा हात लावून, सर्व गोळे लांबून घ्यावेत. गोळे लांबवत लांबवत त्यांची जाडी सुताइतकी बारीक झाली, म्हणजे हाताच्या चार बोटांवर धागा गुंडाळावा. गुंडाळताना मधून मधून फेसलेले तूप सर्व बाजूंनी लावावे. गुंडाळून झाल्यावर बोटांवरून गुंडाळी हलकेच काढून फेसलेल्या तुपात बुडवून घेऊन बाजूला ठेवावी. नंतर तूप गरम करावयास ठेवावे. तूप मंद तापल्यावर पहिली फेणी हातात घेऊन थोडी लांबवून तुपात सोडावी व



विणावयाच्या सुईने फेणीची सुते विरळ विरळ करून ती फेणी तुपात पसरेल, असे करावे. फेणी मंद विस्तवावर तळावी व बाहेर काढून ठेवावी. याप्रमाणे सर्व फेण्या तयार कराव्या. साखरेचा कच्चा पाक करनू त्यात फेण्या बुडवून काढाव्या व नंतर त्यांच्यावर बदाम व पिस्ते यांचे काप घालावेत. हवे असल्यास गुलाबाचे पाणी ही शिंपडावे. सुतारफेण्या रंगीतही करतात. रंगीत करावयाच्या असल्यास केशर किंवा जो रंग घालावयाचा असेल, तो मैदा भिजवतानाच घालावा.

# आपल्या केसांसाठी कोणते तेल योग्य जाणून घेणे आवश्यक

हे तर आपल्या सर्वांना माहितीच आहे की केसांसाठी तेल खूप फायदेशीर आहे. जेव्हा देखील केसांच्या निगा राखण्याची गोष्ट येते त्यामध्ये तेलाचा समावेश नक्की केला जातो. केसांना तेल लावण्याच्या योग्य पद्धती बद्दल आपण बरेच काही ऐकले असतील, परंतु आपल्या केसांसाठी कोणते तेल योग्य आहे हे माहित आहे का ?





नारळाच्या तेलापासून ते ऑर्गन तेल पर्यंतचा वापर केसांसाठी केला जातो. पण आपल्याला त्या तेला पासून जास्तीत जास्त फायदा तेव्हा मिळतो जेव्हा आपण केसांच्या गरजांना समजूनच तेलाची निवड करता. चला तर मग आज आम्ही आपल्याला या लेखात वेगवेगळे तेल आणि त्यांच्या फायद्यांबद्दल माहिती देत आहोत, जे जाणून घेतल्यावर आपण आपल्यासाठी योग्य तेलाची निवड करू शकाल.



### नारळाचं तेल-

केसांचे तज्ज्ञ म्हणतात की जर आपले केस कमकुवत, निस्तेज आहे आणि त्यांना आधार देण्याची गरज आहे तर नारळाचं तेल फायदेशीर ठरेल. हे एक अत्यंत अष्टपैलू तेल आहे आणि हे तुटलेल्या केसांना बरे करण्यास मदत करतं. उष्णतेपासून संरक्षण करत आणि निरोगी केसांच्या वाढीस प्रोत्साहन देत. आपल्या केसांना आपण नारळाचं तेल लावा आणि एका तासासाठी तसेच राहू द्या. नंतर केसांना शॅम्पूने धुऊन घ्या.

### ऑर्गन तेल-

केस तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, ऑर्गनचे तेल केसांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. या तेलामध्ये उच्च प्रमाणात अँटी ऑक्सीडेंट, आवश्यक फॅटी ॲसिड आणि व्हिटॅमिन ई असत आणि केसांना पोषण आणि हायड्रेट करण्यात मदत करतो. केसांची लवचिकता वाढविण्यात मदत करतो आणि निस्तेज लॉक्सची चमक वाढवतो. ऑर्गन तेल एक उत्कृष्ट अँटीऑक्सीडेंट आहे, म्हणून हे टाळू वरील सूज कमी करण्यास मदत करतो, डोक्यातील कोंडा, डोक्यातील खाज तसेच सोरायसिसवर देखील उपचार करण्यात मदत करतो.



### जोजोबा तेल -

जर आपली टाळू कोरडी असल्यास आणि डोक्यात कोंड्याची समस्या आहे, तर जोजोबाचे तेल ही समस्या दूर करण्यात आपली मदत करतं. कारण हे सीबम नावाचे तेल बनवतं. या तेलाला केसांमध्ये वापरू शकता आणि उपचार म्हणून वापरले जाऊ शकत. हे तेल केस आणि टाळूला हायड्रेट करू शकत आणि डोक्यातील कोंड्याला दूर करण्यात मदत करत.

### एरंडेल तेल -

जर आपले केस दाट आहे,तर एरंडेल तेल आदर्श आहे. हे कुरळे केस तसेच तुटणाऱ्या केसांसाठी उपयोगी आहे. हे निरोगी केसांच्या वाढीस प्रोत्साहित करतात आणि या मध्ये फायदेशीर व्हिटॅमिन ई, खनिजे आणि प्रथिने असतात. हे केसांसाठी रात्रभर उपचार म्हणून वापरले जाऊ शकतो.

# फायबरयुक्त आहार

**जेवणामध्ये** तंतू (फायबर)युक्त आहार वाढवणे हा हार्ट अटॅक टाळण्याचा सोपा मार्ग आहे. हा आहार काय करतो?

आतड्यामध्ये एक प्रकारचा जेलीसारखा स्तर निर्माण करतो, जो मंदगतीने आतड्यात पुढे-पुढे सरकतो. त्यामुळे जेवलेल्या पदार्थामधील चरबीचे शरीरात शोषण होत नाही. त्यामुळे हृदयासाठी घातक अशा कोलेस्टेरॉल वाढत नाही. एवढेच नाही बाईल ॲसिड (यकृतामधील पित्त)बरोबर संयुक्त होऊन त्याला शरीराबाहेर फेकण्यास चोथा मदत करतो. नवीन बाईल ॲसिड तयार करण्यासाठी यकृत रक्तामधील कोलेस्टेरॉल वापरते. तेव्हा हार्टअटॅक टाळण्यासाठी कडधान्ये, शेंगाभाज्या (मटार, फरसबी) पालेभाज्या, कोशिंबीर, कोंड्यासहित गहू-तांदूळ, अंजीर- बदाम-खजूर-अक्रोड, भरपूर फळे खा!



# इम्युनिटी वाढवण्यासाठी भारतीय परंपरेच्या ५ टिप्स अंमलात आणा

सध्या सर्वत्र कोरोनाने उच्छाद मांडला आहे. कोरोना विषाणू खूपच प्राण घातक आहे, परंतु या मधून हजारो संक्रमित देखील बरे झाले आहेत. जर आपण वर्दळीच्या ठिकाणी जाणं,लोकांना भेटणं थांबविले आहे तर या विषाणूंपासून वाचण्याचा एकमेव उपाय हाच आहे. या शिवाय भारतीय संस्कृती,परंपरा आणि आयुर्वेदात अशा बऱ्याच उपाय आणि सूचनांचा उल्लेख करण्यात आला आहे, ज्या द्वारे आपण आपली प्रतिकारक शक्ती वाढवू शकतो.

### उपवास -

संपूर्ण एक दिवसाचा उपवास केल्यानं आपल्या शरीरातील जंत आणि विषाक्त पदार्थ काढून आपली रोग प्रतिकारक शक्ती वाढवतो. जर आपण वृद्ध नसाल तर या उपवासाच्या काळात नारळाचे पाणी घ्या आणि एक बाळ हरड घ्यावे.बाळ हरड चावायची नसून चघळायची आहे.हे आपल्या शरीरातील टॉक्सिन किंवा विषारी पदार्थ बाहेर काढतं.

### सूर्य नमस्कार -

आपण दररोज घरातच सूर्य नमस्काराच्या 12 चरण 12 वेळा करावे. या मुळे आपण सर्व प्रकारे फीट किंवा निरोगी होऊन रोगांशी लढण्यासाठी सज्ज व्हाल. असे म्हणू शकतो की कोणतेही विषाणू आपल्यावर परिणाम करणार नाही.



### प्राणायाम -

प्राणायाम केल्यानं आपल्या फुफ्फुसांची क्षमता वाढते. कोरोनाचे विषाणू सर्वप्रथम आपले फुफ्फुसांना संसर्गित करतो. या मुळे श्वास घेण्यास अडचण येते. जर आपले फुफ्फुस सक्रिय आणि बळकट असले तर आपण या विषाणूंवर मात करू शकतो. आपण घरात बसून देखील पूरक म्हणजे श्वास आत घेण्याची प्रक्रिया कुंभक म्हणजे श्वास रोखून ठेवण्याची प्रक्रिया आणि रेचक म्हणजे श्वासाला हळुवार सोडण्याची प्रक्रिया. पूरक, कुंभक आणि रेचकच्या प्रक्रियेला चांगल्या प्रकारे समजून दररोज हे प्राणायाम केल्यानं रोग बरे होतात. या नंतर आपण भ्रस्त्रिका, कपालभाती, शीतली, शीतकारी आणि भ्रामरी प्राणायाम समाविष्ट करावं. हे आपल्या रोग प्रतिकारक शक्तीला वाढवतो.

### तुळशी रस -

बहुतेक सर्व घरातच तुळशीचं रोपटं असत. त्याचे बरेच फायदे आहेत. हे सर्व रोगाणूंना घरात येण्यापूर्वी नष्ट करतात. याच्या नियमितपणे सेवन केल्यानं कोणते ही गंभीर आजार होत नाही. हे आपल्या रोगांशी लढण्याच्या शक्तीला वाढवतो. तुळशीच्या व्यतिरिक्त आपण गिलोय किंवा कडू सेलिसिलिक चा रस दररोज अर्धा कप घेऊ शकता. परंतु ह्याचे सेवन जास्त प्रमाणात करू नये.

आवश्यकतेनुसार आठवड्यातून दोनदा घ्यावे. किंवा आयुर्वेदिक तज्ज्ञाच्या सल्ल्यानुसार घ्यावे. तुळशीच्या सह आलं, काळी मिरी आणि मध योग्य प्रमाणात मिसळून प्यायल्यानं देखील रोग प्रतिकारक शक्ती वाढते.

### शाकाहार स्वीकारा -

पूर्णपणे शाकाहारी जीवनशैली अवलंबवा आणि सूर्यास्ताच्या पूर्वीच जेवण करा. आयुवेर्दानुसार सूर्यास्ताच्या पूर्वीच जेवण करावं.जैन धर्मात या नियमाचे खूप महत्त्व आहे. सूर्यास्तापूर्वी जेवण केल्यानं पचन क्रिया चांगली राहते. अन्नाला पचण्यासाठी सकाळपर्यंतचा पुरेसा वेळ मिळतो. सूर्यास्ताच्या पूर्वी जेवण केल्यानं व्यक्ती अनेक आजारांपासून वाचतो, कारण रात्री आपल्या अन्नात अनेक जंत चिटकून राहतात किंवा आपोआपच उद्भवतात. रात्र सुरू होताच अन्न शिळं होत आणि दूषित होण्याची प्रक्रिया सुरू होऊ लागते. चांगले अन्नच आपल्याला जंतांशी लढण्याची सुरक्षा आणि हमी देत.

# रताळं आवडत नाही? 'हे' फायदे वाचून तुम्ही कराल आहारात समावेश



**भारतीय** आहारात कडधान्य, डाळी यांच्यासोबतच कंदमुळांनादेखील तितकंच महत्त्व आहे.त्यामुळे भारतीय स्वयंपाकघरात बीट, रताळं, मुळा हे सर्रास पाहायला मिळतं. आता या भाज्यांचं महत्त्व साऱ्यांनाच माहित आहे. मात्र, रताळ्याविषयी फार कमी जणांना माहित आहे. साधारणपणे उपवासाच्या दिवशी बटाट्याला पर्याय म्हणून रताळं भाजून किंवा तुपात परतून खाल्लं जातं.

परंतु, रताळं खाण्याचे अनेक गुणकारी फायदे आहेत. हे फायदे नेमके कोणते ते जाणून घेऊयात.

- बारीक, कृश असलेल्या व्यक्तींनी रताळ्याचं सेवन करावं.
- उष्णतेमुळे शरीराची दाह होत असेल तर रताळे उकडून खावे.
- लघवी करण्यास अडथळा येत असल्यास रताळे खावे.
- शरीरावर सूज येत असल्यास रताळ्याचे काप करुन ते तुपावर परतून खावे.
- वारंवार भूक लागत असल्यास रताळे खावे. रताळ्यामुळे भूक लवकर लागत नाही.

**या तक्रारींमध्ये रताळे खाऊ नये**

- पोटात वारंवार गॅस होत असल्यास रताळे खाऊ नये.
- रताळ्यामध्ये नैसर्गिक साखरेचं प्रमाण असल्यामुळे मधुमेह असलेल्यांनी रताळे खाऊ नये.

# दुधात गूळ मिसळून पिण्याचे जादुई फायदे!

दूध हे पूर्णअन्न समजले जाते. रात्री किंवा अवेळी लागलेल्या भूकेवर नियंत्रण मिळवण्यासाठी ते फायदेशीर समजले जाते. निद्रानाशाच्या समस्येवर परिणामकारक असल्याने अनेकजण झोपण्यापूर्वी ग्लासभर दुध पितात. मात्र नुसतेच दूध पिणं शक्य नसलेले अनेकजण त्यामध्ये गोडवा निर्माण करण्यासाठी साखर मिसळतात. मात्र रिफाईन्ड साखर आरोग्याला अपायाकारक असल्याने त्याला नैसर्गिक पर्याय असणाऱ्या गूळाचा आरोग्याला अनेकप्रकारे फायदेशीर ठरते.



### फायदेशीर गूळ

गूळामध्ये मिनरल्स आणि आयर्न घटक मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे शरीरात रक्ताची निर्मिती होणं, मांसपेशी मजबूत होणं, सांध्याचे दुखणे आटोक्यात राहण्यास मदात होते.

### दूधात गूळ मिसळल्याचे फायदे-

दूधात गूळ मिसळून प्यायल्याने पचन सुधारते. पचनाशीसंबंधी काही समस्या असल्यास दूर होतात. सोबतन अन्न पचनाच्या क्रियेला चालना मिळते. दूध-गूळाच्या मिश्रणामुळे पोटात गॅस निर्माण होण्याची शक्यता कमी होते. अस्थमाच्या रूग्णांसाठी गूळ आणि दूधाचे मिश्रण फायदेशीर ठरते. थंड वातावरणात शरीरात नैसर्गिकरित्या उष्णता निर्माण करण्यास मदत करते. यामुळे कफचा त्रास कमी होतो.

सांध्याचे दुखणे असणाऱ्यांसाठी हे मिश्रण अत्यंत फायदेशीर आहे. दुधातील व्हिटॅमिन डी, कॅल्शियम घटक आणि गूळातील आयर्न घटक सांध्यांना अधिक मजबूत बनवतात. गूळचा तुकडा आल्यासोबत चघळल्यानेही फायदा होतो. शरीरात रक्ताची कमतरता असल्यास गूळ खाऊन त्याचे प्रमाण वाढवणं फायदेशीर आहे. गूळामुळे शरीरात हिमोग्लोबिन घटक वाढतात. सोबतच शरीराची रोगप्रतिकारकक्षमता सुधारते. महिलांमध्ये अनियमित मासिकपाळीचा त्रास असल्यास दूध -गुळाचे मिश्रण फायदेशीर ठरते.

वजन घटवण्यासाठी दूधासोबत गूळ मिसळून पिणे हे हेल्दी ड्रिंक आहे. यामुळे शरीरातील चरबी कमी होण्यास, परिणामकारक आणि झटपट वजन कमी होण्यास मदत होते. त्यामुळे साखरेऐवजी गूळ वापरणं अधिक फायदेशीर आहे.

## शॉर्ट न्यूज

### महाविद्यालयात अविष्कार २०२५ स्पर्धेचे आयोजन

**धरणगाव ।** येथील पी.आर. हायस्कूल सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात अविष्कार २०२५ या संशोधन स्पर्धेच्या प्रथम टप्प्याचे जिल्हास्तरिय आयोजन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - विद्यार्थी विकास विभाग व धरणगाव महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे. ही स्पर्धा कला, वाणिज्य-व्यवस्थापन,कायदा, शास्त्र, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी, व औषधी निर्माणशास्त्र या सहा प्रकारात आयोजित करण्यात आलेली आहे. यासाठी जळगाव जिल्ह्यातील एकूण ३८ महाविद्यालयांमधील सुमारे १,१०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

### थंडीचा जोर वाढला, पिके बहरू लागली

**धरणगांव ।** धरणगांव शहरासह तालुक्यातील आनोरे ,धानोरे, गारखेडे, पिंप्री, वाघळुद शिवारात थंडीचा जोर वाढला असून शेकोट्या पेटू लागल्या आहेत. दोन ते तीन दिवसांपासून थंडीचा जोर वाढला असल्याने वातावरणात मोठ्या प्रमाणात गारवा निर्माण झालेला आहे.मागील आठ दिवसापूर्वी थंडीचा जोर कमी झाला होता.परंतु, दोन दिवसांपासून बऱ्यापैकी थंडी पडू लागली आहे.गहू, हरभरा, मका साठी थंडी पोषक ठरणार आहे. दरम्यान, अधिक थंड वातावरणाचा प्रभाव पिकांवर देखील दिसून येत असून मका पिकांवर अळी दिसून येत आहे. त्यामुळे फवारणी करण्यात शेतकरी मग्न आहे. शिवारात रब्बीची पेरणी झाली असल्याने पिकांना पाणी देण्याचा देखील सुरूवात झालेली आहे.

# जळगाव बाजार समितीचे कामकाज ठप्प; राज्यव्यापी बंदात व्यापाऱ्यांचा सहभाग

**बाजार समितीमधील दररोज होणारी सुमारे ५ ते ७ कोटी रुपयांची उलाढाल पूर्णपणे ठप्प**

। जळगाव प्रतिनिधी।

राज्यव्यापी व्यापारी बंदच्या हाकेला प्रतिसाद देत जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व व्यापाऱ्यांनी शुक्रवारी ५ डिसेंबर आपले व्यवहार पूर्णपणे बंद ठेवले. व्यापाऱ्यांच्या या बंदामुळे बाजार समितीमधील दररोज होणारी सुमारे ५ ते ७ कोटी रुपयांची उलाढाल पूर्णपणे ठप्प झाली आहे. पहा याचा व्हिडीओ वृत्तांत अन्नधान्य व खाद्यान्न वस्तूंवर आधीच जीएसटी लागू असताना, त्याचबरोबर बाजार समिती कर (सेस) आकारला जातो. हा बाजार समिती कर (सेस) पूर्णपणे रद्द करावा, तसेच ऑनलाइन परवाना पद्धती आणि अन्य विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील व्यापाऱ्यांनी हा बंद पुकारला आहे. या बंदमध्ये जळगाव बाजार समितीमधील १०० च्या आसपास दुकाने पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. शुक्रवारी सकाळी ११ वाजेपासूनच व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद करून सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवला.



निखिल मोरे

» **या बंदमुळे** आज राज्यभरातून जळगाव बाजार समितीत येणारा शेतमाल येऊ शकला नाही, तसेच बाजार समितीतून बाहेरील जिल्ह्यांमध्ये जाणारा माल देखील जागेवरच थांबला. परिणामी, शेतमाल वाहतूक आणि खरेदी–विक्रीची संपूर्ण साखळी खंडित झाली. व्यापाऱ्यांच्या या एकजुटीमुळे सरकारने त्यांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बाजार समितीचे कामकाज ठप्प झाल्याने शेतकरी आणि ग्राहकांनाही काही प्रमाणात फटका बसला आहे.

## दाणा बाजारासह जळगावमध्ये व्यापार बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जळगाव ।** राज्यभरातील व्यापाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष आणि अन्यायकारक धोरणांच्या निषेधार्थ शुक्रवार, ५ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून एक दिवसाचा राज्यव्यापी बंद पुकारण्यात आला आहे. या बंदला जळगाव शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा देत आपला निषेध नोंदवला. या बंदमध्ये राज्यभरात प्रसिद्ध असलेल्या जळगावच्या दाणा बाजारातील व्यापाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. येथील सर्व व्यापाऱ्यांनी आपली दुकाने पूर्णपणे बंद ठेवली. यामुळे संपूर्ण दाना बाजार परिसरात आज दिवसभर शुकशुकाट पाहायला मिळाला.

व्यापाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये अन्नधान्य व खाद्यान्न वस्तूंवर आधीच जीएसटी लागू असताना, त्याचसोबत आकारला जाणारा बाजार समिती कर (सेस) त्वरित रद्द करावा, तसेच ऑनलाइन परवाना पद्धतीसह इतर प्रशासकीय अडचणी त्वरित दूर कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. जळगाव शहरातील दाणा बाजार परिसरातील १७० हून अधिक व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवून या राज्यव्यापी आंदोलनात सहभाग नोंदविला आहे. दाणा बाजार हा जळगाव शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. येथील व्यापार ठप्प झाल्यामुळे आज कोट्यवधी रुपयांची उलाढाल थांबली आहे. या बंदामुळे केवळ जळगावच नव्हे, तर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतमालाची खरेदी-विक्री थांबल्याने ग्राहक आणि शेतकरी यांच्यावरही अप्रत्यक्ष परिणाम झाला आहे. व्यापाऱ्यांनी केलेल्या या एक दिवसाच्या तीव्र आंदोलनाची सरकारने त्वरित दखल घेऊन त्यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अमळनेर नगरपरिषद निवडणूक २०२५ - प्रतिष्ठेची लढत, शांत मतदानानंतर कयासांना उधाण

। अमळनेर प्रतिनिधी।





**अमळनेर** नगरपरिषदेसाठी ६४.४८ टक्के मतदान पार पडले असून निकाल २१ डिसेंबरला लागणार असल्याने सर्वच राजकीय समीकरणांवर चर्चा रंगू लागली आहे. मतदान शांततेत पार पडले असले तरी, आता पुढील १५ दिवस राजकीय विश्लेषण, कयास आणि चर्चा यांचा उधाण राहणार आहे.

या निवडणुकीत माजी मंत्री अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ, माजी आमदार साहेबराव पाटील आणि दुसरीकडे माजी आमदार शिरीष चौधरी यांची प्रतिष्ठा थेट पणाला लागली आहे. खासदार वाघ आणि आमदार पाटील यांनी स्वतःच्या पक्षावर न लढता आघाडीच्या स्वरूपात निवडणुकीत भाग घेतला. तर दुसरीकडे शिरीष चौधरी यांनी मित्रपरिवार आघाडीचा त्याग करीत शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश करून पक्षाच्या नावावर निवडणूक लढवली.

### एकतर्फी वाटणारी निवडणूक अवघड बनली

» **उमेदवारी** निश्चित होण्यापूर्वी एकतर्फी वाटणारी ही निवडणूक उमेदवारी वाटपानंतर चुरशीची बनली. शिरीष चौधरी यांनी जितेंद्र ठाकूर यांच्यावर केलेल्या आरोपांमुळे वातावरण तापले आणि त्यानंतर आमदार अनिल पाटील यांनीही ही निवडणूक प्रतिष्ठेची केली. साम, दाम, दंड, भेद अशा सर्व डावपेचांचा वापर झाल्याचे शहरभर चर्चा आहेत. ठिकठिकाणी लक्ष्मी दर्शनापासून पैठणी साड्यांपर्यंतचे वाटप चर्चेचा विषय ठरला. ५०० रुपयांपासून ते तब्बल ४ हजार ५०० रुपयांपर्यंतची देणगी असल्याच्या चर्चा होत्या. आर्थिक दृष्टीने अमळनेरकरांना पुन्हा एकदा उच्चांक गाठल्याची अनुभूती आली. तरीही मतदान पूर्णपणे शांततेत आणि उत्साहात झाल्याने मतदारांनी प्रशंसा मिळवली.

### मतदानानंतर चर्चांना उधाण

» **मतदान** संपताच आता कयासबाजीला सुरुवात झाली आहे. त्याने आपले पैसे घेऊन गद्दारी केली, तो फिरलाच नाही, आपल्या मतांनी आपण जिंकू अशा चर्चा कार्यकर्त्यांमध्ये रंगू लागल्या आहेत. मताधिक्यांच्या अंदाजावर अनेक मतमोजण्या सुरू झाल्या असून नेते आणि उमेदवार मात्र कार्यकर्त्यांच्या दिलासादायक शब्दांनी आत्मविश्वास वाढवत आहेत.

### प्रभागनिहाय मतदान – ८ वा सर्वात कमी, १८ वा सर्वात जास्त

» **या निवडणुकीमध्ये** सर्वात कमी मतदान प्रभाग क्रमांक ८ मध्ये नोंदले गेले. प्रभाग ८ मध्ये केवळ ५०.७८ % मतदान झाले. तर सर्वाधिक मतदान प्रभाग १८ मध्ये ७६.८० % इतके झाले. समाजाची मांडणी, कार्यकर्त्यांची गती, उमेदवारांची प्रतिष्ठा, परस्पर नाराजी, नाकारलेले उमेदवार आणि गुप्त मतदान या अनेक घटकांचा परिपाक मतमोजणीत दिसणार आहे. आता २१ डिसेंबरची मतमोजणीची प्रतिक्षा; तेव्हापर्यंत अमळनेर राजकीय पेचप्रसंग, गणिते, अंदाज आणि समीकरणांवर जोरदार चर्चा रंगणार आहेत.

# जळगावात बाप-लेकीचा विजेच्या धक्क्याने मृत्यू, भाची गंभीर

**जळगाव ।** इलेक्ट्रिक शॉक लागल्याने बाप-लेकीचा जागीच मृत्यू झाला तर १६ वर्षाची भाची गंभीर जखमी झाली. ही धक्कादायक घटना शुक्रवार, ५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास जळगाव शहरातील मास्टर कॉलनी येथे घडली. यावेळी जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नातेवाईकांनी मोठी गर्दी केली.

जळगाव शहरातील मास्टर कॉलनीत मौलाना साबीर खान नवाझ खान (३५) हे आपल्या कुटुंबीयांसह वास्तव्याला होते. शुक्रवार, ५ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मौलाना साबीर यांची भाची मारिया फतेमाबी ही कपडे टाकण्यासाठी गच्चीवर गेली होती. त्यावेळी कपडे टाकत असताना जवळच असलेल्या उच्च दाबाची हाय व्होल्टेज इलेक्ट्रिक तारचा तिला धक्का बसला व तिला वाचवण्यासाठी आलिया ही गेली असता तिला पण जोरदार धक्का बसला मुलगी आणि भाची यांना इलेक्ट्रिक शॉक लागल्याचे पाहून मौलाना शाबीर हे त्यांना वाचण्यासाठी गेले असता त्यांना देखील विजेचा जबरदस्त धक्का बसला. या घटनेत मौलाना साबीर खान (३८) व त्यांची मोठी मुलगी आलिया (१२) यांचा यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेत भाची मारिया फतेमाबी ही गंभीर जखमी झाली. तिला नजीकच्या सारा हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.

या घटनेत मौलाना साबीर खान यांचा लहान मुलगा मात्र थोडक्यात बचावला. गेल्या काही महिन्यांपासून उच्च दाबाची विद्युत वाहिनी ही घराजवळून गेल्याने या परिसरातून हे विद्युत वाहिनी हटवावी, अशी मागणी करण्यात आली परंतु महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याने ही घटना घडल्याचे बोलले जात आहे.

# पाचोऱ्यात माझी मुलगी माझा अभिमान कार्यक्रम उद्या; प्रा. वसंत हंकारे यांचे मुलींच्या सक्षमीकरणावर मार्गदर्शन

। पाचोरा प्रतिनिधी।

**शहरात** मुलींच्या सक्षमीकरणाला आणि पालकांमध्ये जागृती निर्माण करण्याला उद्देशून आयोजित करण्यात येत असलेला माझी मुलगी माझा अभिमान हा विशेष उपक्रम उद्या ६ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. मुलींविषयी सकारात्मक दृष्टीकोन, सुरक्षा, प्रोत्साहन आणि सामाजिक बदलाच्या दिशेने वाटचाल घडवून आणणारा हा उपक्रम पालक, विद्यार्थीनी आणि नागरिकांसाठी अत्यंत महत्वाचा ठरणार आहे.

हा कार्यक्रम पाचोरा शहरातील गिरड रोडवर असलेल्या गो.से. हायस्कूल येथे सकाळी १० वाजता अखिल मराठा समाज सेवा प्रतिष्ठान संचलित मराठा महिला दामिनी संघाच्या पुढाकाराने आयोजित होत आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध आणि फायरब्रॅण्ड व्याख्याते म्हणून ओळखले जाणारे प्रा. वसंत हंकारे विशेष उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. मुलींच्या आत्मविश्वास वाढीसाठी, त्यांच्या निर्णयक्षमतेसाठी आणि समाजात त्यांची ओळख अधिक सक्षम करण्यासाठी हंकारे यांचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरणार आहे. कार्यक्रमासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी बापू रोहम, पाचोरा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राहुलकुमार पवार, पो.उ.नि. योगेश गणगे, पिंपळगाव हरेश्वर पोलिस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याणी वर्मा, गटशिक्षणाधिकारी विजय पवार आणि शिक्षण विस्तार अधिकारी समाधान पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मुलींच्या सुरक्षेविषयी, शिक्षणाविषयी आणि हक्कांविषयी प्रशासनाची भूमिका आणि उपाययोजनांवरही या कार्यक्रमाद्वारे महत्त्वपूर्ण संदेश पोहोचणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अखिल मराठा समाज सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. योगेश पाटील, सचिव संजय पाटील, उपाध्यक्ष नितीन पाटील, कार्याध्यक्ष धनराज पाटील तसेच मराठा महिला दामिनी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले असून पालक, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थीनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# मध्य रेल्वेच्या १५ गाड्यात तत्काळ तिकिट बुकिंगसाठी ओटीपी प्रणाली

। भुसावळ प्रतिनिधी।

**तत्काळ** तिकिट बुकिंगमध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि गैरवापर रोखण्यासाठी भारतीय रेल्वेने ओटीपी-आधारित नवी प्रमाणित प्रणाली लागू केली आहे. शनिवार, ६ डिसेंबरपासून मध्य रेल्वेतून सुटणार्या १५ प्रमुख गाड्यांमध्ये तात्काळ तिकिटे जारी करताना प्रवाशांना त्यांच्या नोंदवलेल्या मोबाइल क्रमांकावर आलेल्या वन टाइम पासवर्ड (ओटीपी) ची पडताळणी अनिवार्य आहे, त्याच वेळी त्यांना तिकीट मिळणार आहे. ही नवी व्यवस्था संगणकीकृत पीआरएस काउंटर, अधिकृत एजंट तसेच आयआरसीटीसी वेबसाइट आणि मोबाईल ॲपद्वारे होणार्या सर्व तत्काळ बुकिंगवर लागू राहणार आहे. ओटीपी पडताळणी यशस्वी झाल्यानंतरच तत्काळ तिकीट प्रवाशांना मिळणार आहे, या उपाययोजनेचा उद्देश तत्काळ कोट्याचा लाभ प्रत्यक्ष प्रवाशांनाच मिळावा आणि अनधिकृत बुकिंगवर प्रभावी नियंत्रण ठेवणे हा आहे.

### या गाड्यांमध्ये ओटीपी पडताळणीनंतर तिकीट



» **लोकमान्य** टिळक टर्मिनस–सिकंदराबाद दुरांतो एक्सप्रेस (१२२१९), पुणे–हावडा दुरांतो एक्सप्रेस (१२२२१), लोकमान्य टिळक टर्मिनस–एर्नाकुलम दुरांतो एक्सप्रेस (१२२२३), छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस–हावडा दुरांतो एक्सप्रेस (१२२६१),पुणे–हजरत निजामुद्दीन दुरांतो एक्सप्रेस (१२२६३),छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस–नागपूर दुरांतो एक्सप्रेस (१२२८९), नागपूर–छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस दुरांतो एक्सप्रेस (१२२९०), लोकमान्य टिळक टर्मिनस–प्रयागराज दुरांतो एक्सप्रेस (१२२९३), पुणे–अहमदाबाद दुरांतो एक्सप्रेस (१२२९८), नागपूर–सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेस (२०१०१), पुणे–हुबळी वंदे भारत एक्सप्रेस (२०६७०), छत्रपती शाहू महाराज टर्मिनस कोल्हापूर–पुणे वंदे भारत एक्सप्रेस (२०६७३), पुणे–छत्रपती शाहू महाराज टर्मिनस वंदे भारत एक्सप्रेस (२०६७४), पुणे–हैदराबाद शताब्दी एक्सप्रेस (१२०२५), छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–हजरत निजामुद्दीन राजधानी एक्सप्रेस (२२२२१) ही व्यवस्था ६ डिसेंबरपासून लागू होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने कळवले आहे.

# यावल तालुक्यातील खून प्रकरणी चार आरोपींना अटक

**सोशल मिडीयात रील्स टाकण्याचा वाद जीवावर**

। यावल प्रतिनिधी।

**सोशल** मिडीयावर रिल्स तयार करून त्यावर शिवीगाळ केल्याच्या कारणावरून यावल-बोरावल रस्त्यावरील पाटचारीजवळ जळगावातील समता नगरातील रहिवासी तुषार चंद्रकांत तायडे (१९) वर्षीय तरुणाच्या खून प्रकरणी संशयित आरोपी अविनाश सोनवणे (सुजदे, ता.जळगाव), निलेश कोळी (रा.बोरनार, ता.जळगाव), कल्पेश इंगळे (आसोदा), विजय सोनवणे (सुजदे) यांना अटक करण्यात आली. गुरुवारी संशयीला न्यायालयात उपस्थित केले असता न्यायाधीश आर. एस. जगताप यांनी १० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. मयत तुषार चंद्रकांत तायडे (समतानगर, जळगाव) याने काही दिवसापूर्वी इन्स्टाग्रामवर रिल तयार करून त्यात शिवीगाळ केली होती व त्यातून तुषार तायडे यास २ डिसेंबरच्या सायंकाळी सात वाजेच्या दरम्यान यावल-शेळगांव रस्त्यावरील बोरावल गावाजवळील पाटचारीजवळ अडवत राहुल सोनवणे, विक्रम सोनवणे व सहकार्यांनी लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण केल्याने मध्यरात्रीच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला.

याप्रकरणी तुषारचे वडील चंद्रकांत तायडे यांनी यावल पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर संशयित आरोपी अविनाश सोनवणे (सुजदे, ता.जळगाव), निलेश कोळी (बोरनार, ता.जळगाव), कल्पेश इंगळे (आसोदा), विजय सोनवणे (सुजदे) यांना पोलिसांनी अटक केली. संशयीतांना गुरुवारी न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायाधीश आर. एस. जगताप यांनी यांनी १० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. तपास पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे करीत आहेत.

# सोनी नगरात चोरट्यांचा धुमाकूळ; दोन ठिकाणी चोरी, सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरटे कैद



**जळगाव ।** जळगाव शहरातील पिंप्राळा शिवारातील सोनी नगर भागात चोरट्यांनी मध्यरात्री धुमाकूळ घालत एकाच रात्री दोन बंद घरे फोडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दोन्ही घरातून चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. ही घटना गुरूवारी ४ डिसेंबर रोजीच्या मध्यरात्री घडल्याची माहिती आहे.

सोनी नगरात राहणारे गणेश भगवान माळी हे ३० नोव्हेंबरपासून सहकुटुंब मूळ गावी गेले होते. ४ डिसेंबर, गुरुवारी सकाळी त्यांच्या शेजाऱ्यांनी दरवाजा तुटलेला असल्याची माहिती त्यांना फोनवरून दिली. माळी कुटुंब तातडीने घरी परतले असता, त्यांच्या घरातील कपाटाचे लॉकर तोडलेले आढळले. चोरट्यांनी घरातून तीन तोळे सोन्याच्या बांगड्या, १० ग्रॅमचे मणी मंगळसूत्र आणि ६ ग्रॅमचे कानातील टॉप्स असा सुमारे १ लाख ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरला होता.

याच गल्लीत राहणारे सुनिल रामदास सुरवाडे यांचेही बंद घर चोरट्यांनी लक्ष्य केले. त्यांच्या घरातून चोरट्यांनी २५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. एकाच रात्री दोन घरफोड्या झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच रामानंद नगर पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, पहाटेच्या सुमारास तोंडाला मास्क व रुमाल बांधलेले चार संशयित चोरटे या फुटेजमध्ये कैद झाले आहेत. पोलिसांनी आता या फुटेजच्या आधारे चोरट्यांचा कसून शोध सुरू केला आहे. एकाच रात्री झालेल्या या धाडसी चोरीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# अमळनेर ईव्हीएम मशीन स्ट्राँग रूमवर २४ तास बंदोबस्त

। अमळनेर प्रतिनिधी।

**नगरपालिका** सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान झाल्यानंतर सर्व ईव्हीएम मशीन शहरातील इंदिरा गांधी भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आले असून खबरदारीचा उपाय म्हणून बंदुकधारी पोलिसांचा २४ तास कडक पहारा सुरू आहे.

२ डिसेंबर रोजी संपन्न झालेल्या मतदान प्रक्रियेनंतर शहरातील ९७ मतदान केंद्रावरून आलेल्या सर्व ईव्हीएम मशीनचे सीलबंद बॉक्स स्ट्राँग रूममध्ये जमा करण्यात आले आहेत. तसेच शहरातील एकूण १८ प्रभागांपैकी प्रभाग क्रमांक ६-अ मध्ये नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याने या प्रभागात मतदान झाले नाही. तसेच प्रभाग क्रमांक १-अ मध्ये नगरसेवक पदासाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे एकूण ३४ नगरसेवक पदांसाठी आणि नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीतील ६ नगराध्यक्ष तसेच १२९ नगरसेवक उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले आहे.



### मतमोजणी २१ डिसेंबरला

» **मतमोजणी** २१ डिसेंबर रोजी होणार असून त्यासाठी आवश्यक तयारी प्रशासनाने पूर्ण केली आहे. स्ट्राँग रूमच्या चारही बाजूंना तारेच्या जाळीचे कुंपण करण्यात आले असून बंदुकधारी पोलीस तैनात आहेत. तसेच परिसर सीसीटीव्हीच्या सततपणे निगराणीत आहे.

### सामान्य नागरिकांना प्रवेश बंद

» **स्ट्राँग** रूम परिसरात स्थानिक नागरिकांना फिरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही अनपेक्षित परिस्थितीला तोंड देण्यासाठी सुरक्षा यंत्रणा सतर्क राहून रात्रंदिवस पहारा देत आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक राहावी, कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी प्रशासनाकडून वरील सर्व सुरक्षा उपाय काटेकोर रित्या अंमलात आणले जात आहेत.

# यावलमध्ये गुरुचरित्र पारायण सप्ताहाची भक्तीमय सांगता

**सप्ताहात धार्मिक विधींची मांदियाळी : सेवकांचा उत्स्फूर्त सहभाग**

। यावल प्रतिनिधी।

श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, दिंडोरी प्रणीत, परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मंगलमय आशीर्वादाने यावल शहरात दत्त जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या सामूहिक गुरुचरित्र पारायण व अखंड नामजप यज्ञ सप्ताहाची महाप्रसादाने सांगता झाली. भुसावळ रोडवरील टेलिफोन ऑफिसजवळ असलेल्या बालसंस्कार व अध्यात्मिक केंद्रात हा सात दिवसीय भक्तिमय सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या गुरुपीठाचे पीठासीन गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात गुरुचरित्र पारायण वाचन, अखंड नामजप यज्ञ, गणेश याग, मनोबोध याग, श्री स्वामी याग, गीताई याग, चंडी याग, रुद्रयाग, मल्हार याग आणि बली पूर्णाहुती अशा विविध यागांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी श्री दत्त जन्मोत्सव, सत्यदत्त पूजन आणि महाआरती अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पडली.



» **या सात** दिवसांच्या अखंड नामजप यज्ञ सप्ताहात यावल शहरासह तालुक्यातील महिला व पुरुष सेवकरी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. दिवसा सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत महिलांनी, तर सायंकाळी ७ ते सकाळी ७ वाजेपर्यंत पुरुषांनी अखंड नामजप प्रहर सेवेत उत्साहाने सहभाग घेतला. यावल केंद्रात दत्त जयंती सोहळ्यानिमित्त आकर्षक रांगोळी आणि फुलांनी सुंदर सजावट करण्यात आली होती.

### समाजाभिमुख विषयांवर मार्गदर्शन

» **सप्ताह** काळात केंद्रातील प्रमुख प्रतिनिधींनी सेवकांना सेंद्रिय शेती, सामूहिक सामुद्रिक शास्त्र, पर्यावरण, प्रकृती, विवाह संस्कार आणि पशुसंवर्धन यांसारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच, जीवनातील अडचणी व समस्यांवर आध्यात्मिक उपायही सांगितले. शुक्रवारी सकाळी भूपाळी आरती, सत्यदत्त पूजन, महानैवेद्य आरती होऊन अखंड नामजप यज्ञ सप्ताहाची सांगता झाली. याप्रसंगी सेवकांना ५ जानेवारी २०२६ रोजी उज्जैन येथे राष्ट्रीय संकट निवारणासाठी आयोजित करण्यात आलेल्या भस्म लिंगार्चन सोहळ्याबद्दलही माहिती देण्यात आली. या यशस्वी सोहळ्यामुळे यावल शहरात अध्यात्मिक विचारांना नवी दिशा मिळाली आहे.

## संपादकीय

# कंत्राटांची खैरात

भारतातील घराणेशाहीचा रोग बराच जुना असला तरी आता तो खूपच मोठ्या प्रमाणावर बळावत चालला आहे. पुढच्या निवडणुकीत आपल्याला तिकीट मिळाले नाही तर पत्नी, मुलगा, मुलगी, सून यांपैकी कुणाला वारसदार करायचे हे आधीच ठरते. नगरसेवकापासून मंत्र्यापर्यंत साऱ्याच नेत्यांचा यासाठीचा आटापिटा पहावयास मिळतो. आतातर आपल्या राजकीय पदाचे सारे लाभ कुटुंबीयांप्रमाणेच आपल्या इतर नातेवाईकांपर्यंतही कसे पोहचतील याचीही दक्षता घेतली जाते. हे कुठल्या एका प्रांतात चालते असे नव्हे, तर संपूर्ण देशभरात सर्वत्र हीच परिस्थिती आहे. अरुणाचलचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्या कुटुंबीयांच्या कंपन्यांना तवांग या एकाच जिल्ह्यात तब्बल ३१ कामांची कंत्राटे देण्यात आल्याचे उघडकीस आल्याने हा तर अद्भुत संयोग आहे, या शब्दात सर्वोच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. अरुणाचल सरकार सर्व महत्त्वाची कंत्राटे मुख्यमंत्र्यांच्या कुटुंबाच्या किंवा अगदी निकटवर्तीयांच्या मालकीच्या कंपन्यांना देते. कंत्राटे देण्याची प्रक्रिया पार डावलून हे मुख्यमंत्री मनमानी करत सार्वजनिक निधी स्वतःच्या घरी वळवतात, असा आरोप न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेत आहे. गेल्या दहा वर्षांत देण्यात आलेल्या सर्व सरकारी कंत्राटांची माहिती मागवणाऱ्या या याचिकेवर न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावली आहे. राज्य सरकारने दाखल केलेल्या मागील प्रतिज्ञापत्रातील माहितीचा हवाला देत याचिकाकर्त्याने सर्व प्रकरणांमध्ये केवळ दोन कंपन्यांनी निविदा सादर करण्यात आल्याचे आणि त्यातील मुख्यमंत्र्यांशी संबंधित कंपन्यांनी केवळ ०.०१ टक्के कमी दराने बोली लावली म्हणून त्यांनाच सर्व काम देण्यात आल्याचा दावा केला आहे. पेमा खांडू हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री असल्याचेही न्यायालयात उघड झाले. त्यांची मालमत्ता ३३२ कोटी रुपयांच्या घरात आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्यांच्या कुटुंबातील सर्वच सदस्य कंत्राटदार आहेत आणि ते बांधकाम कंपन्या चालवतात. या मुख्यमंत्र्यांच्या भ्रष्टाचाराचा संबंध फक्त कुठल्या एका पक्षाशी जोडणे अन्याय आहे, कारण याआधी त्यांनी काँग्रेस पक्षाचे आणि दुसऱ्या प्रादेशिक पक्षाचे मुख्यमंत्री म्हणूनही काम केले आहे. सत्तास्थानाचा फायदा घेत कुटुंबीयांचे भले करणाऱ्यांमधील पेमा खांडू हे एक प्रातिनिधिक नाव आहे. देशात असे अनेक मंत्री आणि मुख्यमंत्री आहेत ज्यांची संपत्ती मोजमापाच्या पलीकडे आहे. लालूप्रसाद यादव यांच्यासह अनेक शेकडो दिग्गज नेत्यांची नावे घेता येतील ज्यांनी आपल्या पदाचा अशाचप्रकारे पुरेपूर गैरवापर केला आहे. दुर्दैवाने महाराष्ट्रही या सगळ्यात आघाडीवर आहे. आजवर इथे अनेक मुख्यमंत्र्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. आजवर किती मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले याची तर गणतीच नाही. सारेच लोकप्रतिनिधी आपापल्या लोकांचे भले करण्यात गुंतले आहेत. निवडणुकीत कार्यकर्ते एकमेकांची डोकी फोडतात, त्यामागे त्यांना मिळणारी कंत्राटे हेच एकमेव कारण असते. एकदा का सत्ता मिळाली की, अशा स्वामिनिष्ठ कार्यकर्त्यांवर कंत्राटांची खैरात होते. मग कंत्राटदार म्हणून त्यांची पात्रता असो वा नसो. त्यांच्या टक्केवारीच्या कारस्थानांमध्ये करदात्या जनतेच्या पैशांची मात्र राखरांगोळी होते. भ्रष्टाचाराचा सामना करण्यासाठी देशात अनेक संवैधानिक संस्था स्थापन झाल्या असल्या तरी कोणतीही संस्था महत्त्वाच्या पदावर बसलेल्या नेत्याचा असा भ्रष्टाचार उघडकीस आणण्याची कामगिरी बजावताना दिसत नाही. कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात गेला तरच तो उघडकीस येतो. अन्यथा, माहिती अधिकार अशी माहिती उघड करतो. सर्वच राजकीय पक्ष विरोधी पक्षात असताना आपणच प्रामाणिक असल्याचे दावे करतात. मात्र जेव्हा ते सरकार स्थापन करतात तेव्हा त्यांना भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करणे सोयीचे वाटते. संवैधानिक संस्थांमधील सर्वात मोठी समस्या ही आहे की, सरकारे त्यांच्या स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार लोकांना नियुक्त करतात आणि देशातील काही पदे वगळता, उर्वरित पदांवर सत्तेचे रक्षकच असतात. प्रत्येक संवैधानिक संस्थेवर सत्तेने पसंत केलेल्या लोकांचे इतके वर्चस्व आहे की, भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी ज्यांना पदे दिली जातात ते सत्ताधाऱ्यांची पालखी वाहणारे भोई होतात. जे पक्ष सत्तेबाहेर असतात तेच भ्रष्टाचाराच्या या चर्चेत अप्रासंगिक राहतात. परंतु इतर पक्ष इतरांवर भ्रष्टाचाराचे आरोप करत स्वतः मात्र भ्रष्टाचारात लोळत आणि स्वतःला निष्पक्ष सिद्ध करण्याचा प्रयत्न करत राहतात. त्यामुळे लोकशाहीची प्रतिमा डागाळली जात आहे. स्वातंत्र्यानंतरही देशाची परिस्थिती सुधारण्याऐवजी उत्तरोत्तर खंगतच चालली आहे.

**भारतातील राजकारणात घराणेशाही आणि नेत्यांच्या कुटुंबीयांना कंत्राटे देण्याची प्रथा दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे सार्वजनिक निधीचा गैरवापर होत असून लोकशाहीची प्रतिमा डागाळली जात आहे.**

## मनन चिंतन

ह.भ.प. देवदत्त परुळेकर



### आतलं समाधान महत्त्वाचं

विधिनिषेध उर फोडी। जंव नाहीं अनुभवगोडी ॥
वाढे तळमळ उभयता। नाहीं देखिलें अनुभवितां ॥

तुकाराम महाराज यांचा हा अभंग माणसाच्या आतल्या शोधाचा आरसा आहे. आपण कितीही नियम, पूजापाठ, शिस्त पाळली तरी जर आत समाधान नाही तर सगळं व्यर्थ वाटतं. बाहेर सगळं व्यवस्थित असलं, तरी हृदय म्हणत राहतं, 'अजून काहीतरी मिळायला हवं, जे खऱ्या अर्थाने माझं आहे!' नियमांचा आधार आपल्याला दिशा देतो, पण आनंदाचा अनुभवच पुढे नेतो. हा अनुभव फक्त धार्मिक असतो असं नाही, जीवनात तो कुठेही लागू पडतो.



नेपाळमधील कीर्तनसिंग कायलास हा एक सर्वसामान्य घरातील मुलगा. छोटा असताना त्याने एव्हरेस्टकडे बघून स्वप्न पाहिलं- 'एक दिवस मी तिथे पाऊल ठेवणार!' स्वप्न उंच, त्यामुळे त्याची तयारीही तितकीच कठोर. नियम, शिस्त, व्यायाम, डाएट सगळं १००% पाळलं. पण पहिल्याच मोहिमेत शरीर साथ देईनासं झालं. हवामान वाईट, श्वास अडकलेला. त्याला मागे फिरावं लागलं. त्या रात्री त्याला प्रचंड दुःख झालं. 'मी सगळं नीट करत होतो तरी अपयश का?' मग कीर्तनला जाणवलं, तो पर्वत जिंकण्याच्या धडपडीत पर्वत अनुभवायलाच विसरला होता. शिखरावर जाण्याच्या घाईत, शिखरापर्यंतच्या प्रवासाचा आनंद घेत नव्हता. मग त्याने निर्णय घेतला- 'मी जिंकायला नाही, जगायला निघालो आहे!' आणि जेव्हा तो पुन्हा एव्हरेस्टकडे निघाला, त्याच्या डोळ्यांत भीती नव्हती तर अनुभवाची तहान होती! प्रत्येक पावलात स्वातंत्र्य, प्रत्येक श्वासात जिद्द, प्रत्येक क्षणात आनंद होता आणि अखेर तो शिखरावर पोहोचला! खाली आल्यानंतर त्याचे शब्द असे होते- 'Today, I felt the mountain. And it lifted me.' (आज मी पर्वताला जाणलं आणि त्याने मला उचलून नेलं!)

नुसते नियम मनाला तोडतात, तर अनुभव मन घडवतो. काम किती हे महत्त्वाचं नाही. काम करताना काय वाटतं हे महत्त्वाचं. मनाची शांती उपासना किती केली याने नाही तर भक्तीची गोडी लागली यावर ठरते. धावपळ किती केली याने यश नाही मिळत पण प्रत्येक पावलात आनंद आहे का याने मात्र आयुष्य ठरतं. आज आपण स्वतःला विचारू, 'मी फक्त नियम पाळतोय? की जीवनाचा गोडवा अनुभवतोय?' कारण शेवटी अनुभव हाच अंतरंगातील भगवान आहे. जेव्हा त्याचा स्पर्श होतो, तेव्हा आयुष्याचं प्रत्येक पान सुंदर होतं!

## देश-विदेश

भावेश ब्राह्मणकर



# या देशातही लष्कराने सत्ता ताब्यात घेतली

**राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधकांनी विजय मिळाल्याचे घोषित केले. अभूतपूर्व गोंधळ उडाला. अराजकामुळे लष्कराने सत्ता ताब्यात घेऊन अनेक नेत्यांना जेरबंद केले. आता पुढे काय होणार, कुणालाच माहीत नाही.**

आफ्रिका खंडात असलेला गिनी बिसाऊ हा देश सध्या अराजक आणि राजकीय अस्थैर्यातून जात आहे. निमित्त ठरले ते राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचे. २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या निवडणुकीत निकाल घोषित होण्यापूर्वीच गदारोळ उडाला. विरोधी पक्षाचे नेते फर्नांडो डायस आणि सत्ताधारी रे डोनाल्ड यांनी स्वतंत्रपणे घोषित केले की, 'आपल्याला ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली असून प्रथम फेरीतच विजय प्राप्त झाला आहे. त्यामुळे दुसऱ्या फेरीच्या मतमोजणीची गरज नाही.' परिणामी, अधिकृत निकाल जाहीर तर झालाच नाही, पण देशात आंदोलनांची लाट आली. हे सारे पाहून लष्कराने सत्ता ताब्यात घेतली आणि देशात संचारबंदी लागू केली. तत्काळ सर्व सार्वजनिक संस्था, सरकार, संसद, माध्यमे, निवडणूक आयोग इत्यादींना निलंबित करण्यात आले. देशाच्या बाहेरील आणि आंतरराष्ट्रीय सीमाही बंद करण्यात आल्या. सत्ताधारी व विरोधी नेत्यांनाही नजरकैद केले गेले. पुन्हा एकदा हा देश अस्थैर्याच्या गर्तेत ढकलला गेला आहे. आफ्रिकन युनियनसह अनेक देशांनी चिंता व्यक्त करून देशात स्थैर्य आणण्याची मागणी केली आहे.

गिनी बिसाऊ देशाचा इतिहास पाहिला तर तो अस्थैर्य, बंड, अराजक आदींनी भरलेला आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात हा प्रदेश शतकानुशतके मांडिंगा, फुला, बियाफाडा, बालांता अशा आफ्रिकन जमातींचा होता. १३ ते १५ व्या शतकात हा प्रदेश माली साम्राज्य व नंतर काबू साम्राज्य याच्या प्रभावाखाली होता. सोने, मीठ, गुलाम यांचा व्यापार यासाठी हा प्रदेश महत्त्वाचा होता. १५ ते १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत पोर्तुगीजांनी या देशावर राज्य केले. त्यामुळे हा प्रदेश पोर्तुगीज गिनी नावानेही ओळखला जायचा. पोर्तुगीजांनी येथे गुलाम व्यापाराचे प्रमुख तळ उभारले होते. १९५० नंतर देशात अमिल्कार काब्राल यांच्या नेतृत्वात स्वातंत्र्यलढ्याची चळवळ सुरू झाली. अनेक छुपी युद्धे झाली. १९७४ मध्ये पोर्तुगालमध्ये कार्नेशन क्रांती झाली. त्यानंतर गिनी बिसाऊला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता मिळाली. लुईस कॅब्राल या पहिल्या राष्ट्राध्यक्ष बनल्या. देशाने समाजवादी मॉडेल स्वीकारले.

आर्थिक अडचणी आणि जातीय तणाव देशात वाढतच गेला. १९८० मध्ये जोओ बर्नार्डो व्हिएरा यांनी लष्करी बंड करून सत्ताच्युत केले. ते १८ वर्षे सत्तेत राहिले. पायाभूत सुविधांचा विकास न झाल्याने भ्रष्टाचार बोकाळतच आहे. सैन्य आणि सत्तेत तणावाचे वातावरण वाढतच आहे. १९९०च्या दशकात बहुपक्षीय लोकशाही मार्ग स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, १९९८-९९ मध्ये गृहयुद्धाने देशाला पोखरले. राष्ट्राध्यक्ष आणि सैन्यप्रमुख यांच्यात संघर्ष वाढला. अखेर राष्ट्राध्यक्ष देश सोडून पळून गेले. देशात प्रचंड आर्थिक नाश झाला. २००० नंतर सततची राजकीय अस्थिरता आहे. सतत सरकार बदल, सैनिकी बंड, हत्या, निलंबन याने देश ग्रस्त आहे. २००३ आणखी एक लष्करी बंड झाले. २००९ मध्ये राष्ट्राध्यक्षांची हत्या झाली. २०१२ मध्ये पुन्हा लष्करी तख्तापालट झाला. २०१४ मध्ये लोकशाही निवडणुका झाल्या, पण स्थैर्य तात्पुरतेच ठरले. २०१९-२०२२ या काळात सरकार आणि सैन्य यांच्यात वारंवार संघर्ष झाला. २०२३ मध्ये संसदेत सशस्त्र संघर्ष झाला. सैन्याने हस्तक्षेप केला. आता यंदाही निवडणूक झाली, पण अराजक निर्माण झाले आहे.

गिनी बिसाऊला मादक द्रव्य तस्करीचा गंभीर विळखा पडला आहे. ड्रग्ज तस्करच देशातील राजकारणात हस्तक्षेप करीत आहेत. गिनी बिसाऊ अटलांटिक महासागराला लागून आहे. किनारी भागात बेटे आहेत. युरोप–आफ्रिका–दक्षिण अमेरिका या तिन्ही दिशांना समुद्री जोडणी करणारा हा प्रदेश आहे. गिनी बिसाऊ अटलांटिक महासागराला लागून आहे. युरोप, चीन आणि रशिया या देशांचे मासेमारी हक्क व व्यापार-भागीदारी आहे. काजू उत्पादन या देशाचा आर्थिक कणा आहे. येथून काजूची मोठी निर्यात होते. देशात केवळ शेतीचाच आधार आहे. उद्योग जवळपास नाहीतच. गुंतवणूक नसल्याने रोजगारासह अन्य गंभीर प्रश्न आहेत. देशात गरिबीने अजस्त्र हायपाय पसरले आहेत.

यंदाच्या निवडणुकीत झालेला गदारोळ चिंता वाढविणारा आहे. निवडणूक आयोगावर सत्ताधाऱ्यांचे नियंत्रण असल्याच्या तक्रारी आहेत. एकूणच पारदर्शकतेवर प्रश्न आहेत. राष्ट्राध्यक्ष एम्बालो यांनी सैन्यावर नियंत्रण वाढवण्याचा प्रयत्न केल्याने सैन्यातील काही गट एम्बालो यांचे विरोधक बनले. हे गट आक्रमक झाले. आम्ही राष्ट्रीय सुरक्षा व लोकशाही वाचवत आहोत, असा दावा करून पुढे आले. ड्रग तस्करी रोखण्यासाठी सत्ता हस्तगत केल्याचा दावा सैन्यातील काही गट करत आहेत. काही सैन्य गटांना वाटते की युरोप, भारत, अमेरिकेसारख्या देशांचे निरीक्षण वाढले आहे. गिनी बिसाऊचा इतिहासच तख्तापालटांनी भरलेला आहे. सत्तेवर कब्जा करणे ही सैन्यासाठी सामान्य बाब आहे. गिनी बिसाऊमधील सध्याचे तख्तापालट हे अचानक मुळीच नाही. निवडणुकीतील गडबड, सैन्य–सत्ताधारी संघर्ष, मादक द्रव्य तस्करीचे जाळे, कमजोर संस्था, ऐतिहासिक अस्थिरता या सर्वांचा एकत्रित परिणाम आहे.

गिनी बिसाऊ हा भौगोलिकदृष्ट्या लॅटिन अमेरिकेतून युरोपकडे जाणाऱ्या कोकेनसारख्या नशिली पदार्थांच्या मार्गात येते. त्यामुळे देशातील 'नार्को स्टेट' अशी बाजू मानली जाते. ड्रग्ज तस्करी आणि व्यापारातून मिळणारा पैसा बऱ्याचदा राजकीय आणि सैन्य प्रतिनिधींमध्ये जातो. त्यामुळे भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी सत्तेकडे आकर्षित होते. अनेकदा हा अवैध पैसा निवडणुकीमध्ये, सैन्यात किंवा शासनात वापरला जातो. परिणामी लोकशाही टिकविणे आणि पारदर्शकता राखणे कठीण होते. सरकार आणि शासकीय यंत्रणा ही भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. संसद, न्यायव्यवस्था, प्रशासन हे फारच कमकुवत बनले आहेत. वारंवार संसदेचे विघटन, संवैधानिक प्रश्न, सरकार आणि संसदेतील तणाव हे सर्व संस्थात्मक अस्थिरतेचे कारण बनतात. गरिबीशी झुंजणाऱ्या जनतेला कुठलाही आशेचा किरण दिसत नाहीय. अशावेळी लष्कर आणि सत्ताधारी स्वार्थाची पोळी भाजून घेत आहेत. आरोग्य, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, स्वच्छता अशा सर्वच क्षेत्रात अनेक आव्हाने दिवसागणिक वाढत आहेत.

गिनी बिसाऊ हा जगाच्या पाठीवरील असाच एक देश आहे जेथील जनता मोठ्या बदलाची किंवा चमत्काराची वाट पाहत आहे. तो कधी आणि कसा होईल हे आतातरी सांगता येत नाही. गिनी बिसाऊसारखे असे अनेक देश आहेत. मानवतेला काळीमा फासून स्वार्थाची पोळी भाजून घेणारे जोवर आहेत तोवर हे सारेच देश होरपळणार आहेत. संयुक्त राष्ट्रासारखी संस्थाही हतबल आहे. हे कशाचे निदर्शक मानावे?

**bhavbrahma@gmail.com**
**संरक्षण, सामरिकशास्त्र, आंतरराष्ट्रीय घडामोडी, परराष्ट्र संबंध अभ्यासक आणि मुक्त पत्रकार.**

## विशेष

रचना मेहरा



# कामगार सुरक्षा, महिला सक्षमता

**भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी कामगार महिलांचा सहभाग अनिवार्य आहे. व्यावसायिक सुरक्षा संहिता, २०२० या संहितेद्वारे सुरक्षित आणि समावेशक कामाच्या परिस्थितीची नवीन दृष्टी उभी झाली आहे.**

भारताचा दीर्घकालीन आर्थिक विकास हा कामगार जगतातील महिलांच्या पूर्णतः समावेशनासोबत अतूटपणे जोडलेला आहे. अलीकडच्या काळात धोरणकर्ते आणि जागतिक संस्था महिलांच्या आर्थिक सहभागाच्या परिवर्तनीय क्षमतेची अधिकाधिक दखल घेत आहेत. यामुळे देशाच्या प्रगतीला एक उत्साहवर्धक गती मिळत आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (ILO) अहवालानुसार, २०२४ मध्ये भारताचा महिला कामगार वर्गाच्या सहभागाचा दर (LFPR) ३२.८% इतका होता, जो जागतिक दर (४८.९%) आणि पूर्व आशियातील दर (५९.२%) या तुलनेत निश्चितच कमी आहे.

तरीही, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या नियमित कामगार मनुष्यबळविषयक सर्वेक्षण (PLFS) २०२३-२४ च्या ताज्या अहवालानुसार, महिलांचा कार्यरत मनुष्यबळातील सहभाग (LFPR) ४१.७% पर्यंत वाढला आहे, जो २०१७-१८ मध्ये २३.३% इतका कमी होता. ही लक्षणीय प्रगती असूनही, घर-कुटुंबातील विनावेतनाची सेवा (Unpaid Care Work) आणि घरातील सदस्यांची सेवा-सुश्रुषा करण्याची जबाबदारी हे आजही महिलांच्या आर्थिक सहभागातील प्रमुख अडथळे आहेत. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या सर्वेक्षणानुसार, भारतीय महिला दररोज २ तास १७ मिनिटे विनावेतन सेवा-सुश्रुषेशी संबंधित कामे करतात, तर पुरुष केवळ १ तास १५ मिनिटे देतात. हा असमान भार अनेक महिलांना नोकरीच्या संधी नाकारण्यास किंवा कमी पगाराची कामे करण्यास भाग पाडतो.

व्यावसायिक सुरक्षा संहितेची (OSH Code, 2020) परिवर्तनीय क्षमता- या पार्श्वभूमीवर, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची परिस्थिती संहिता, २०२० (OSH Code, 2020) लागू होणे, हे भारताच्या समावेशक प्रगतीच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या संहितेने असुरक्षित कामाची ठिकाणे आणि मर्यादित कायदेशीर संरक्षण असलेल्या लाखो महिलांसाठी सुरक्षित कामाच्या परिस्थितीची सुनिश्चिती केली आहे.



**या संहितेची प्रमुख वैशिष्ट्ये-**

**सुरक्षित कामाच्या ठिकाणांची सुनिश्चिती :** ही संहिता १० किंवा अधिक कामगार असलेल्या सर्व आस्थापनांसाठी सुरक्षिततेच्या तरतुदींचे मानकीकरण करते.

**मातृत्व आणि बालसंगोपन :** या संहितेला मातृत्व लाभ (सुधारणा) अधिनियम, २०१७ सोबत जोडले गेले आहे. यामुळे स्तनपानासाठी विश्रांती दिली जाईल याची सुनिश्चिती केली गेली असून, महिला कार्यरत मनुष्यबळात टिकून राहण्यास मदत होईल.

**पाळणाघरांची तरतूद :** मोठ्या आस्थापनांमध्ये पाळणाघरांची सुविधा अनिवार्य करून सेवा-सुश्रुषेशी संबंधित कामाचा ताण कमी करण्यास मदत केली आहे.

**अनौपचारिक क्षेत्राला संरक्षण :** या संहितेच्या माध्यमातून कंत्राटी आणि अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांना (उदा. बांधकाम, कृषी, घरगुती कामगार) एकसमान सुरक्षा छत्राखाली आणले गेले आहे.

**भेदभाव नसलेली भरती :** भरती आणि कामाच्या परिस्थितीत भेदभाव न करण्याची बंधनकारक तरतूद केली गेली आहे, ज्यामुळे कामाची ठिकाणे लिंगभाव आधारित आव्हानांना अधिक सक्षमतेने प्रतिसाद देणारी बनतील.

**जागतिक धडे आणि भारतासाठी शिकवण-**

जागतिक अनुभवावरून हे सिद्ध झाले आहे की, व्यावसायिक सुरक्षा आणि लिंगभावाच्या बाबतीत संवेदनशीलतेने केलेल्या सुधारणांमुळे महिलांचा कामगार जगतातील सहभाग वाढण्यास मोठी मदत होते.

स्वीडन आणि आईसलँड या देशांनी कामाच्या ठिकाणावरची सुरक्षा, बालसंगोपनासाठीचे अनुदान आणि पालक म्हणून दिली जाणारी रजा याचे एकात्मिकीकरण करून सामाजिक संरक्षण आराखडा लागू केला. परिणामी, तिथल्या कार्यरत मनुष्यबळातील महिलांचा सहभागाचा दर ७०% पेक्षा जास्त आहे.

चिली आणि उरुग्वे या लॅटिन अमेरिकेतील देशांमध्ये सरकारी निधी पुरस्कृत बालसंगोपनामुळे, बालविकासासोबत कोणतीही तडजोड न करता महिलांचा रोजगार क्षेत्रातील सहभाग वाढला आहे.

या उदाहरणांवरून स्पष्ट होते की, व्यावसायिक सुरक्षा संहितेतील उपाययोजनांचे सेवा-सुश्रुषेशी संबंधित पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीसोबत एकात्मिकीकरण केल्यास भारतातही परिवर्तनीय परिणाम साधता येतील.

**आर्थिक सुसंगतीकरण आणि पुढील वाटचाल**

महिलांच्या सहभागाला प्राधान्य देणे ही केवळ सामाजिक बांधिलकी नाही, तर स्थूल अर्थव्यवस्थेची गरज आहे. मॅकिन्से ग्लोबल इन्स्टिट्यूटने असा अंदाज व्यक्त केला आहे की, लिंगभावातील तफावत कमी केल्यास २०२५पर्यंत जागतिक सकल देशांतर्गत उत्पादनात (GDP) १२ ट्रिलियन डॉलरची भर पडेल, ज्यात भारताचा वाटा सुमारे ७७० अब्ज डॉलर इतका असेल.

**पुढील वाटचाल-**

**बालसंगोपन पायाभूत सुविधांचे बळकटीकरण :** व्यावसायिक सुरक्षा संहितेच्या अंमलबजावणीसोबत, एकात्मिक बालविकास सेवा (ICDS) आणि राष्ट्रीय पाळणाघर योजनेचा विस्तार करणे आवश्यक आहे.

**असंघटित क्षेत्रातील लाभांचा विस्तार :** असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ESIC) लाभांचा विस्तार करणे.

**जागरूकता आणि लवचिक पद्धती :** महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल माहिती देण्यासाठी तळागाळापर्यंत जागरूकता मोहिमा राबवणे, तसेच नियोक्त्यांनी लवचिक कामाचे वेळापत्रक आणि लिंगभाव संवेदनशील पद्धतींचा अवलंब करणे.

व्यावसायिक सुरक्षा संहिता, २०२० हे दीर्घकालीन, लिंगभाव आधारित समावेशनाच्या प्रगतीचे एक धोरणात्मक साधन आहे. या संहितेच्या तातडीच्या आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे महिला मनुष्यबळाच्या क्षमता अधिक खुल्या होतील. यातून स्पष्ट होते की, व्यावसायिक सुरक्षा संहिता, २०२० भारताच्या समावेशक, स्पर्धात्मक आणि लवचिक अर्थव्यवस्थेच्या दिशेने एक महत्त्वाचे धोरणात्मक साधन आहे, ज्यामुळे महिला मनुष्यबळाच्या क्षमता खुल्या होतील आणि आत्मनिर्भर भारताची संकल्पना साकार होईल.

**(लेखिका गुजरातमधील अरविंद लिमिटेडच्या मनुष्यबळ विकास विभागात प्रमुख आहेत)**

# नक्षत्रांचा आकाशप्रवास – राशींसोबतची त्यांची दिव्य मैत्री



ज्योतिष
अनुजा राजे
लेखिका

**भारतीय** ज्योतिषशास्त्राची खरी ओळख केवळ राशींमध्ये नसते; त्या राशींना प्राण देणाऱ्या २७ नक्षत्रांमध्ये असते. प्रत्येक नक्षत्र विशिष्ट राशीत पसरलेले असते आणि त्यांची ऊर्जा त्या राशीच्या स्वभावाला अद्वितीय रंग देते. म्हणूनच नक्षत्रे हे ज्योतिषाचे सूक्ष्म तंत्रज्ञान मानले जाते-अचूक, विशिष्ट आणि खोलवर प्रभाव करणारे.चला तर, या २७ नक्षत्रांचा आणि त्यांच्या राशींशी असलेल्या अद्भुत नात्याचा एक सुंदर प्रवास करूया.

सुरुवात होते अश्विनी नक्षत्राने, जे पूर्णपणे मेष राशीत पसरलेले आहे. त्यानंतर भरणी देखील मेषमध्येच येते, आणि कृत्तिकेचा पहिला भाग मेषमध्ये तर उर्वरित वृषभ राशीत जातो. मग रोहिणी पूर्णपणे वृषभ राशीत येते; तर मृगशीर्ष वृषभ आणि मिथुन दोन्ही राशींमध्ये विभागलेले आहे. पुढील आर्द्रा, पुनर्वसू आणि पुष्य ही तीनही नक्षत्रे सुंदर कर्क राशीत ऊर्जा फुलवतात.

यानंतर आश्लेषा कर्कमध्येच समाप्त होते आणि मघा पूर्णपणे सिंह राशीत झळकते. पूर्वा फाल्गुनी सिंहमध्येच आहे, तर उत्तर फाल्गुनीचे पहिले पाद सिंहमध्ये आणि उर्वरित तीन पाद कन्या राशीत येतात. पुढील हस्त आणि चित्रेचा पूर्वार्ध कन्या राशीत राहतो; तर चित्रेचा उत्तरार्ध तुला राशीत येतो.

तुला राशीत स्वाती, विशाखेचा प्रारंभिक भाग, तर विशाखेचा उत्तरार्ध वृश्चिक राशीत जातो. अनुराधा आणि ज्येष्ठा ही नक्षत्रे संपूर्णपणे वृश्चिक राशीतच विस्तारलेली असतात.

यानंतर मूळ, पूर्वाषाढा आणि उत्तराषाढेचा पहिला पाद हे धनु राशीत येतात; तर उत्तराषाढेचे उर्वरित तीन पाद मकर राशीत पसरतात. पुढील श्रवण आणि धनिष्ठेचा पहिला भाग मकरमध्ये असून धनिष्ठेचा उर्वरित भाग कुंभ राशीत येतो. यानंतर शतभिषा संपूर्णपणे कुंभमध्ये फुलते; पूर्वाभाद्रपदा कुंभ आणि मीन राशी अशा दोन्हीमध्ये विभागलेली असते; तर उत्तराभाद्रपदा व रेवती संपूर्णतः मीन राशीत सुखाने विसावतात. हीच ती २७ नक्षत्रांची दिव्य माला-मेषपासून मीनपर्यंत पसरलेली-ज्यात प्रत्येक नक्षत्र राशीला एक अद्वितीय व्यक्तिमत्व देते. राशी म्हणजे रंगमंच, तर नक्षत्र म्हणजे त्यावर नृत्य करणारी ऊर्जा. एखादा ग्रह कोणत्या राशीत आहे हे महत्त्वाचे असतेच, पण तो कोणत्या नक्षत्रात आहे हे जाणून घेतल्यावरच त्या ग्रहाची खरी कथा उलगडते.

म्हणूनच जातकाचे चंद्रनक्षत्र त्याचा भावनिक स्वभाव ठरवते, लग्न नक्षत्र त्याचे कर्मदिशा सांगते आणि सूर्यनक्षत्र त्याच्या आत्म्याचा उद्देश स्पष्ट करते. या २७ नक्षत्रांशिवाय ज्योतिष म्हणजे पाण्याशिवाय नदी-नाव असते, पण प्रवाह नसतो. अशा या २७ नक्षत्रांची नावे प्रत्येक ज्योतिषप्रेमींनी झोपेतून उठवले तरी लगेच म्हणता यायला हवीत. कारण राशी आपली बाह्य ओळख सांगतात, पण नक्षत्रे आपल्या स्वभावाचे खरे उछ- सांगतात.ज्योतिषशास्त्राच्या प्राचीन परंपरेप्रमाणे. मेष राशीत तीन नक्षत्रांचे पद येतात : अश्विनी, भरणी, आणि कृत्तिकेचा पहिला पद.

- मेष राशीचे नक्षत्र विश्व ....मेष रास ही अग्नी तत्त्वाची, मंगळस्वामी असलेली, धैर्य, वेग, पुढाकार आणि जिद्द यांची रास. म्हणून यामध्ये येणाऱ्या नक्षत्रांमध्ये वेग, उत्साह, आग्रहीपणा, ऊर्जा आणि नवनिर्मितीचा भाव दिसतो.

अश्विनी नक्षत्र (शून्य अंश ते तेरा अंश वीस मिनिटे ) - मेष रास
देवता - अश्विनी कुमार (दिव्य वैद्य) .ग्रहस्वामी - केतू . तत्त्व - अग्नी . मुख्य गुण - वेग, उपचार क्षमता, नवीन सुरुवात, चमत्कारिक पुनरुत्थान.
नक्षत्राची कथा -अश्विनी कुमार - देवराजांच्या सेनेतील दिव्य वैद्यभूत देवता. त्यांना जगातील पहिल्या डॉक्टरांचे स्थान दिले जाते.कथा आहे की, ते सूर्यदेव आणि संज्ञा यांचे तेजस्वी अश्वस्वरूप द्विजन्म पुत्र होते.अश्विनी कुमारांना शस्त्रक्रिया, औषध, जडीबुटी, आणि क्षणात उपचार करण्याची दैवी क्षमता होती.त्यांच्या शक्तीमुळे अश्विनी नक्षत्रात जन्मलेल्या लोकांचे जीवनामध्ये - चमत्कारिक सुरुवाती ,अचानक निर्णय ,संकटातून झपाट्याने बाहेर पडणे ,स्वतः चे आणि इतरांचे उपचार ,नवीन मार्ग निर्माण करणे हे गुण खोलवर दिसतात.
व्यक्तिमत्त्वाचे प्रभाव- अश्विनी नक्षत्र मेष राशीत असल्याने - वेग, उत्साह, स्पर्धा, पुढे धावण्याची वृत्ती अधिक तीव्र होते. हे लोक आयुष्यात स्टार्टर्स असतात- जे करायचे ते लगेच, उद्याच्या हातात न ठेवता आज. आध्यात्मिक संदेश - प्रारंभ हा तुमचा धर्म आहे. विश्व तुमच्या वेगावर उभे आहे.

भरणी नक्षत्र (तेरा अंश वीस मिनिटे ते सव्वीस अंश चाळीस मिनिटे ) - मेष रास देवता - यम ,धर्मराज . ग्रहस्वामी - शुक्र . स्वभाव - तीव्र, अंतर्मुख, गुप्तशक्ती, तपस्या, सहनशक्ती.
नक्षत्राची कथा-भरणीची देवता यम - मृत्यूचे देव, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे धर्म, न्याय आणि सत्याचे संरक्षक. यमाची ऊर्जा भीतीदायक नसून - सीमा, नियम, जबाबदारी आणि सत्य यांना दर्शवते. कथांनुसार, यम देवाला सत्यापासून कधीच दूर जाता येत नाही. त्यामुळे भरणी नक्षत्रातील लोकांत -कठोर निर्णय घेण्याची क्षमता , सत्याला सामोरे जाण्याचं धैर्य , प्रचंड सहनशक्ती , बदल किंवा शेवट स्वीकारण्याची ताकददिसून येते. भरणी म्हणजे गर्भ धारण करणे. याचे आद्य-स्त्री तत्त्व, सृजनशक्ती, परिवर्तन, कष्ट आणि शिस्त यांच्याशी खोल नाते आहे. मेष राशीत भरणीचा प्रभाव- शुक्र आणि मंगळ - प्रचंड जीवनशक्ती, आकर्षण, कलात्मक उर्जा आणि तडफदार स्वभाव.हे लोक -तीव्र इच्छाशक्तीचे ,अत्यंत प्रामाणिक ,निर्णायक ,धारदार बुद्धीचे असतात. भरणी लोकांचे जीवन नेहमी ट्रान्सफॉर्मेशन घेऊन येते - जिथे संकटातून नवे जन्म घडतात. आध्यात्मिक संदेश -सत्य स्वीकारा. सत्यच तुम्हाला मुक्त करेल.

कृत्तिका नक्षत्र (पहिला पाद - मेष रास)
देवता - अग्निदेव .ग्रहस्वामी - सूर्य .स्वभाव - शुद्धीकरण, तेज, कठोरता, संरक्षण, नेतृत्व ,कृत्तिका नक्षत्राचे पहिले तीन अंश वीस मिनिटे मेष राशीत येतात. नक्षत्राची कथा कृत्तिका म्हणजे कृत्त - कापणे, विभाजित करणे. कृत्तिका हे सप्तकन्या आहेत - ज्यांनी कुमारा कार्तिकेयाचे पालनपोषण केले. त्यामुळे कृत्तिका हे मातृत्व, संरक्षण आणि तेज या गुणांनी भरलेले आहे.देवता अग्निदेव - शुद्धीकरण करणारा, प्रकाश देणारा, जळून किंवा वितळून सत्य प्रकट करणारा तत्त्व. म्हणूनच कृत्तिका जन्माचे लोक - सत्यनिष्ठ, कठोर, पण योग्य , तेजस्वी , निर्णयक्षम ,नेतृत्वशील असतात. कृत्तिका अग्नीची ऊर्जा देत असल्याने मेष राशीचा मंगळ अधिक धारदार बनतो. मेष राशीत कृत्तिकेचा प्रभाव- येथील अग्नी निर्मितीचा आणि शुद्धीकरणाचा असतो. ही लोकं - खरे बोलणारे ,सरळ ,कार्यक्षम , स्वच्छ विचारांचे ,अर्धवट काम न मानणारे असतात.आध्यात्मिक संदेश-स्वतःला शुद्ध करा. तुमच्या तेजातच तुमचा मार्ग आहे. आपला नक्षत्रप्रवास पुढील लेखातही असाच सुरू राहील

## बाजारभाव

| | |
|---|---|
| सोने | ₹ १,३१,६०० (१० ग्रॅम) |
| चांदी | ₹ १,८०,००० (१ किलो) |
| डॉलर ₹ | ८९.९६ +१९पैसे |
| सेन्सेक्स | ८५,२६५.३२ +१५८.५१ |
| निफ्टी | २६,०३३.७५ +४७.७५ |

## निवडक

### टाटा म्युच्युअल फंडची निधी उभारणी

**मुंबई :** डिजिटल पेमेंट्स आणि डिजिटल बँकिंगसाठी पायाभूत यंत्रणा पुरविणारी अग्रगण्य कंपनी नेटवर्क पीपल सर्व्हिस टेक्नोलॉजीज लि.ने टाटा म्युच्युअल फंडद्वारे संपूर्ण सदस्यता घेण्यात आलेल्या प्रिफरेन्शियल इश्युच्या माध्यमातून ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी उभारल्याची घोषणा केली.

### ए-आयचे लॅपटॅब

**नवी दिल्ली :** भारतातील सर्वात वेगाने वाढणारा टेक बँड असलेल्या एआय + ने एआय लॅपटॅब ही नवीन स्मार्ट डिव्हाइस श्रेणी सादर केली आहे ती लॅपटॉपची उत्पादकता आणि टॅब्लची पोर्टेबिलिटी एकत्र करते, असा दावा करण्यात आला आहे. उपकरण ११, १२, १३ कीबोर्ड, स्टायलस सपोर्टसह ते २०२६ च्या पहिल्या तिमाहीत फ्लिपकार्ट आणि रिटेल भागीदारांद्वारे उपलब्ध असेल.

### एसुस ७% वाढ

**मुंबई :** एसुसने २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत भारतातील नंबर २ कंझ्युमर नोटबुक कंपनी म्हणून स्थान मजबूत केले आहे, असे आयडीसी क्वार्टरली पर्सनल कॉम्प्युटिंग डिव्हाइस ट्रॅकर, २०२५ च्या तिसऱ्या तिमाही अहवालात म्हटले आहे. हा टप्पा ६०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये उत्पादन अनुभव वाढवण्यासाठी, उत्पादन पोर्टफोलिओ वाढविण्यासाठी महत्त्वाचा आहे, असेही म्हटले आहे.

### पीएनबीचे ब्रेल क्रेडिट कार्ड

**मुंबई :** सार्वजनिक क्षेत्रातील पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) ने दिल्ली येथील कॉर्पोरेट कार्यालयात आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन साजरा केला. हा कार्यक्रम पीएनबीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक चंद्र, प्रमुख अतिथी आंतरराष्ट्रीय पॅरा-बॅडमिंटन खेळाडू व पीएचडी स्कॉलर मुन्ना खालिद तसेच मुख्य सतर्कता अधिकारी राघवेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत झाला.

### के. व्ही. टॉईज इंडियाचा आयपीओ

**मुंबई :** शैक्षणिक आणि मनोरंजन श्रेणींमध्ये मुलांसाठी प्लास्टिक-मोल्डेड आणि धातू-आधारित खेळण्यांचे कंत्राटी उत्पादन आणि विक्री करण्यात व्यस्त के. व्ही. टॉयज इंडियाने त्यांचा आयपीओ सादर करण्याची घोषणा केली आहे. प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या १६,८०,००० पर्यंतच्या इक्विटी शेअरचा नवीन इश्यू असेल.

### ऑडी इंडियाची वाहन मोहीम

**मुंबई :** ऑडी इंडियाने अॅशुअर्ड बायबॅक, एक्स्टेण्डेड वॉरंटी आणि ऑडी ड्राइव्ह शुअर अशा सर्वसमावेशक उपक्रमांच्या माध्यमातून ब्रँड अपवादात्मक ग्राहक अनुभव देऊ केला आहे. देशभरातील डिलरशिप्सनी अॅशुअर्ड बायबॅक प्रोग्राम सादर केला.

# अर्थ घडामोडीला वेग!

## रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारतात येताच आर्थिक व्यवहार सुरू

**नवी दिल्ली :** रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या गुरुवारपासूनच्या भारतभेटीने अर्थजगतातील घडामोडींनी वेग घेतला आहे. रशियाची सर्वात मोठी बँक एसबरबँक (Sberbank) आणि जेएससी फर्स्ट ही निधी मालमत्ता व्यवस्थापन कंपनीने एक नवीन म्युच्युअल फंड-फर्स्ट इंडिया गुरुवारी सादर केला. त्याचबरोबर वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि त्यांचे कॅनेडियन समकक्ष मनिंदर सिद्धू यांनी बुधवारी प्रस्तावित मुक्त व्यापार करारावर वाटाघाटी सुरू करण्यासाठी आराखडे, उद्दिष्टे आणि पद्धतींवर चर्चा केली. तिकडे औषध उत्पादक ल्युपिनने गुरुवारी सांगितले की त्यांनी कर्करोगाच्या रुग्णांमध्ये न्यूट्रोपेनियाच्या उपचारांसाठी सूचित केलेल्या बायोसिमिलर, आर्मलूपेगचे व्यावसायिकीकरण करण्यासाठी अमेरिकेतील व्हॅलोरम बायोलॉजिक्ससोबत परवाना करार केला आहे.

**रशियन बँकेचा भारतात नवा फंड**

रशियाची सर्वात मोठी बँक एसबरबँक (Sberbank) आणि जेएससी फर्स्ट ही निधी मालमत्ता व्यवस्थापन कंपनीने एक नवीन म्युच्युअल फंड - फर्स्ट इंडिया गुरुवारी सादर केला. तो निफ्टी५० निर्देशांकाच्या कामगिरीशी जोडलेली गुंतवणूक पर्याय देऊ करतो. यामुळे रशियन किरकोळ गुंतवणूकदारांना भारताच्या शेअर बाजाराशी थेट संपर्क साधता येईल.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या गुरुवारपासून सुरू होणाऱ्या नवी दिल्लीच्या जवळपास २७ तासांच्या दौऱ्यादरम्यान ही घोषणा करण्यात आली आहे. एसबरबँकचे सीईओ आणि कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष हरमन ग्रेफ यांनी त्यांच्या भारताच्या व्यावसायिक भेटीदरम्यान नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया येथे झालेल्या एका कार्यक्रमात या फंडाच्या लाँचची घोषणा करण्यात आली, असे शेअर बाजाराने गुरुवारच्या एका निवेदनात स्पष्ट केले आहे.

रशियाच्या राष्ट्राध्यक्षांची ही २३ वी भारत-रशिया वार्षिक शिखर परिषद आहे. ही भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे.



### यंदाच्या भेटीतील प्रमुख मुद्दे

- मोठे संरक्षण करार
- एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीच्या सुरू असलेल्या पुरवठ्याचा आढावा
- नवे सु-५७ फायटर जेट्स खरेदी करण्याबाबत भारताची उत्सुकता

**२०२४-२५ मध्ये भारताची रशियाला निर्यात ४.९ अब्ज डॉलर होती, तर मागील आर्थिक वर्षात आयात ६३.८ अब्ज डॉलर होती. त्यामुळे ५९ अब्ज डॉलरचे व्यापार तूट निर्माण झाली. दोन्ही देशांनी २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर द्विपक्षीय व्यापाराचे लक्ष्य निश्चित केले आहे.**

**रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची गेल्या चार वर्षांतली ही दुसरी भारत भेट आहे. कोविड-१९ महासाथ सुरू असल्याने २०२१ मध्ये त्यांनी केलेली भारत भेट केवळ पाच तासांच्या कालावधीत पार पडली होती.**

**या भेटीत पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण, ऊर्जा आणि दीर्घकालीन भागीदारीविषयी चर्चा केली होती. त्यांच्या या भेटीनंतर तीन महिन्यांनी रशियाने युक्रेनवर मोठ्या प्रमाणात आक्रमण केले.**

### 'त्या' भेटीत नेमके काय घडले होते..?

- पुतिन यांनी ६ डिसेंबर २०२१ रोजी २१ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेकरिता भारताचा दौरा केला होता. त्यांनी पंतप्रधान मोदी आणि उच्चस्तरीय प्रतिनिधीमंडळासोबत बैठक घेतली. दोन्ही नेत्यांनी "विशेष आणि विशेषाधिकारयुक्त सामरिक भागीदारी" कोविड काळातही सक्षम राहिल्याचे अधोरेखित केले.
- **दोन्ही देशांनी घेतलेला आढावा :**
  - संरक्षण आणि सामरिक सहकार्याची सखोल समीक्षा
  - २+२ संवाद यंत्रणेची सुरुवात स्वागतार्ह असल्याचे मत
  - सैन्य-तांत्रिक सहकार्य विस्तारावर भर
- **इतर प्रमुख चर्चा विषय :**
  - द्विपक्षीय गुंतवणूक वाढविणे
  - आयएनएसटीसी मार्ग आणि प्रस्तावित चेन्नई-व्लादिवोस्तोक सागरी मार्गाद्वारे संपर्क वाढविणे
  - दीर्घकालीन विकासाच्या नव्या संधी निर्माण करणे
  - अफगाणिस्तानची परिस्थिती, महामारीनंतरचा आर्थिक पुनरुज्जीवन मार्ग
  - संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेसह बहुपक्षीय मंचांवर दोन्ही देशांच्या भूमिकांतील सामायिकता
- **दोन अब्ज डॉलरची पाणबुडी करार :**
  - व्यापार, ऊर्जा, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, शिक्षण आणि अवकाश या क्षेत्रांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. दौऱ्याच्या अखेरीस पुतिन यांनी मोदींना २०२२ मधील पुढील शिखर परिषदेकरिता रशियाला भेट देण्यासाठी आमंत्रित केले.
- **नवे भू-राजकीय वास्तव**
  - पुतिन यांची २०२१ मधील भारत भेट अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हाइट हाऊसमध्ये पुनरागमनापूर्वीची होती. मागील तीन वर्षांत पाश्चात्य देशांनी मोठ्या प्रमाणावर भारताकडून स्वस्त रशियन तेल खरेदीकडे दुर्लक्ष केले होते.

परंतु आता ट्रम्प यांच्या भारतविषयक टीकात्मक वक्तव्यांमुळे आणि अमेरिकेने लावलेल्या उच्च आयात शुल्कामुळे दोन्ही देशांतील संबंधांमध्ये तणाव वाढल्याची चिन्हे सध्या दिसतात.

# घसरता रुपया महागाईतील इंधन!

**नवी दिल्ली :** घसरत चाललेला रुपया निर्यातदार आणि आयटी क्षेत्राला काही प्रमाणात मदत करू शकतो, पण आयात महाग केल्यामुळे महागाई वाढण्याचा धोका वाढतो, असे तज्ज्ञांनी सांगितले आहे.

अमेरिकन डॉलरसामोर रुपया ९० च्या खाली कोसळल्यानंतर विरोधी पक्षांनी सामान्य नागरिकांवर होणाऱ्या परिणामाबद्दल चिंता व्यक्त केली. हा मुद्दा संसदेतही मांडण्यात आला.

ब्रिकवर्क रेटिंग्जचे प्रमुख (क्रायटेरिया, मॉडेल डेव्हलपमेंट अँड रिसर्च) राजीव शरण म्हणाले की, रुपया ९० च्या खाली गेल्यामुळे आयटी आणि वस्त्रोद्योगासारख्या निर्यात क्षेत्रांना स्पर्धात्मक फायदा मिळेल, पण कच्च्या तेलासह आयातीत कच्चामाल महाग झाल्यामुळे उद्योगांच्या मार्जिनवर ताण येईल आणि व्यापार तूट वाढेल. त्यांनी सांगितले की, वाढती महागाई ग्राहक मागणी आणि कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम करू शकते.



- २०२६ मध्ये उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परिस्थिती अधिक कठीण होऊ शकते.
- अमेरिका-भारत व्यापार करारातील विलंब, सध्याच्या टप्प्यावर प्रतिकूल शुल्क संरचना, कमजोर इक्विटी पोर्टफोलिओ गुंतवणूक, उत्पादन/निर्यात यांवर असलेला भर याने रुपयावर दबाव वाढवला आहे.

### रुपया अखेर सावरला

**मुंबई :** अमेरिकन डॉलर निर्देशांकातील मंदी आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कथित हस्तक्षेपाच्या वृत्तांमुळे गुरुवारी रुपया त्याच्या सर्वकालीन नीचांकी पातळीवरून सावरला आणि १९ पैशांनी वाढून ८९.९६ वर बंद झाला.

एडीपी नॉन-फार्म पेरोल डेटा अंदाजापेक्षा खूपच कमी आल्यानंतर डॉलरचे मूल्य घसरले आणि अमेरिकन डॉलर निर्देशांकातील मंदीमुळे खालच्या पातळीवर रुपयाला आधार मिळाला, असे फॉरेक्स व्यापाऱ्यांनी सांगितले.

परदेशी गुंतवणूकदारांकडून विक्रीचा दबाव आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे रुपया दिवसाच्या सुरुवातीला कमकुवत झाला आणि ९०.४३ या नवीन नीचांकी पातळीवर पोहोचला. भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेस झालेल्या विलंबाचाही रुपयावर भार पडला आहे. बुधवारी रुपयाने पहिल्यांदाच डॉलरच्या तुलनेत ९० पातळी ओलांडली होती.

### संभाव्य दर कपातीने सोने दर कमी

**नवी दिल्ली :** कमकुवत जागतिक ट्रेंड आणि गुंतवणूकदारांच्या सावधगिरीमुळे गुरुवारी राष्ट्रीय राजधानीत सोन्याच्या किमती ६०० रुपयांनी घसरून १,३१,६०० रुपये प्रति १० ग्रॅम झाल्या. चांदीचा भाव सलग दुसऱ्या दिवशीही घसरत १,८०,००० रुपये प्रति किलोग्रॅम झाला. "पुढील आठवड्यात होणाऱ्या फेडरल ओपन मार्केट कमिटीच्या धोरण निर्णयापूर्वी बाजारातील सहभागींनी घेतलेल्या सावधगिरीच्या सूचनेमुळे आणि त्यानंतरच्या खरेदीच्या अभावामुळे गुरुवारी सोन्याच्या किमतीत घट झाली," असे एचडीएफसी सिक्युरिटीजचे वरिष्ठ विश्लेषक - कमोडिटीज सौमिल गांधी म्हणाले.

# शेअर बाजार पुन्हा तेजीत

### चार दिवसांची घसरण थांबली

**मुंबई :** चार दिवसांच्या घसरणीला ब्रेक देत, गुरुवारी तंत्रज्ञान आणि आयटी शेअर्समध्ये खरेदीमुळे बेंचमार्क स्टॉक इंडेक्स सेन्सेक्स आणि निफ्टी पुन्हा तेजीत आले.

बीएसई सेन्सेक्स १५८.५१ अंकांनी वधारून ८५,२६५.३२ वर स्थिरावला. दिवसभरात तो ३८०.४ अंकांनी वधारून ८५,४८७.२१ वर पोहोचला.

एनएसई निफ्टी ४७.७५ अंकांनी वधारून २६,०३३.७५ वर पोहोचला. बुधवारपासून सलग चार सत्रांमध्ये सेन्सेक्स ६१३ अंकांनी घसरला तर निफ्टी २३० अंकांनी घसरला. सेन्सेक्समधील शेअर्समध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टेक महिंद्रा, इन्फोसिस, एचसीएल टेक, भारती एअरटेल, सन फार्मा, भारती इलेक्ट्रॉनिक्स आणि ट्रेंट हे प्रमुख वधारले. तर मारुती, इटरनल, कोटक महिंद्रा बँक आणि टायटन हे शेअर्स घसरले.

विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी बुधवारी ३,२०६.९२ कोटी रुपयांचे शेअर्स विकले, तर देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ४,७३०.४१ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले.

आशियाई बाजारात, दक्षिण कोरियाचा कोस्पी, शांघायचा एसएसई कंपोझिट इंडेक्स कमी झाला.

# सीमलेस ट्यूब उत्पादक निर्यातीसाठी उत्पादन-संबंधित सवलतींची मागणी




**नवी दिल्ली :** सीमलेस ट्यूब मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एसटीएमएआय) ने सरकारला त्यांच्या उत्पादनांच्या निर्यातीच्या किमान १० टक्के हिस्सा उत्पादन-संबंधित प्रोत्साहन (पीएलआय) योजना सुरू करण्याची विनंती केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केली आहे.

अशा प्रोत्साहनांमुळे या क्षेत्रातील भारताच्या निर्यात वाढीला गती मिळेल, असे असोसिएशनने म्हटले आहे. भारतीय उत्पादक देशांतर्गत गरजांसाठी तयार केलेले उच्च दर्जाचे सीमलेस पाईप्स तयार करतात आणि परदेशात नवीन बाजारपेठांचा सक्रियपणे शोध घेतात हे अधोरेखित करते.

एसटीएमएआयचे अध्यक्ष शिवकुमार सिंघल यांनी सीमलेस पाईप्सच्या बेकायदेशीर आयातीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज यावरही भर दिला, ज्याचा देशांतर्गत उत्पादकांवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

देशांतर्गत उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी आगामी वार्षिक अर्थसंकल्पात अशा आयातीवरील सीमाशुल्क सध्याच्या १० टक्क्यांवरून २० टक्के करण्याची मागणी केली.

पोलाद मंत्रालयासोबत झालेल्या बैठकीत या चिंता उपस्थित करण्यात आल्या आणि असोसिएशनला आशा आहे की येत्या अर्थसंकल्पात या मुद्द्यांवर लक्ष दिले जाईल.

एसटीएमएआय सीमलेस पाईप्स आणि ट्यूब्सच्या देशांतर्गत उत्पादकांचे प्रतिनिधित्व करते.

जागतिक सीमलेस पाईप निर्यात बाजारपेठेत भारत एक महत्त्वाचा खेळाडू म्हणून उदयास येत आहे. २०२३ मध्ये, देशाने ६०६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स किमतीचे १७२,००० टन सीमलेस स्टील पाईप्स निर्यात केले. एचएस कोड ७३०४ अंतर्गत वर्गीकृत केलेले हे पाईप्स प्रामुख्याने तेल आणि वायू, अभियांत्रिकी आणि पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रांना सेवा देतात.

केंद्रीय अर्थसंकल्प येत्या फेब्रुवारी २०२६ मध्ये संसदेत सादर केला जाणार असून त्यासाठीच्या पूर्वबैठका अर्थमंत्री गेल्या काही दिवसांपासून घेत आहेत.

# अल्केम लॅब्सला जीएसटी मागणी नोटीस

**नवी दिल्ली :** अल्केम लॅबोरेटरीजला उत्तराखंड अधिकाऱ्यांकडून २७.१४ लाख रुपयांची जीएसटी मागणी नोटीस मिळाली आहे.

कंपनीला देहरादून केंद्रीय वस्तू आणि सेवा कर विभागाकडून २०१८-२०१९ ते २०२२-२०२३ या कालावधीसाठी २७,१४,६०३ रुपयांचा जीएसटी आणि २७,७९,२६६ रुपयांचा दंड मागण्याचा आदेश मिळाला आहे, असे औषध कंपनीने नियामक यंत्रणेला सांगितले आहे. अधिकाऱ्यांनी तरतुदींनुसार लागू व्याजदेखील मागितले आहे, असे त्यात म्हटले आहे. डिमांड ऑर्डरमध्ये प्रामुख्याने आयटीसीचा जास्त वापर केल्याचा आरोप आहे. कंपनी डिमांड ऑर्डरशी सहमत नाही आणि ती त्याला आव्हान देईल, असे म्हटले आहे.

# सिंडिकेट कुरिअर, ई-कॉम शिपमेंटचा गैरवापर

## भारतात अमली पदार्थांच्या तस्करीचा धोका कायम; केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळ अध्यक्षांचा दावा

**नवी दिल्ली :** कुरिअर आणि ई-कॉमर्स शिपमेंटचा वापर करून आंतरराष्ट्रीय सिंडिकेट तस्करी करत असल्याने भारतात अंमली पदार्थांच्या तस्करीचा धोका कायम असल्याचे केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाचे अध्यक्ष विवेक चतुर्वेदी यांनी गुरुवारी सांगितले.

### क्रिप्टो, स्टेबलकॉइन्सचा वापर ड्रग्ज, सोने तस्करी रॅकेटच्या निधीसाठी : डीआरआय

**अलीकडच्या वर्षांत बेकायदेशीर पेमेंट आणि गुन्ह्यातील पैशांच्या हस्तांतरणासाठी क्रिप्टोकरन्सीचा वापर वाढला आहे, विशेषतः ड्रग्ज आणि सोन्याच्या तस्करी प्रकरणांमध्ये, यूएसडीटीसारख्या स्टेबलकॉइन्सने पारंपरिक हवाला नेटवर्कची जागा वाढवत असल्याचे डीआरआयच्या अहवालात गुरुवारी म्हटले आहे.**

राजस्व गुप्तचर संचालनालयाच्या ६८व्या स्थापना दिनानिमित्त संबोधित करताना त्यांनी अधिकाऱ्यांना उदयोन्मुख धोक्यांच्या पुढे राहण्यासाठी आणि तस्करीचे नमुने ओळखण्यासाठी प्रगत डेटा विश्लेषणाचा सतत वापर करण्याचे आवाहन केले.

गेल्या वर्षी, राजस्व गुप्तचर संचालनालयाने ६५ किलो कोकेन, २२५ किलो मेथॅम्फेटामाइन आणि जवळपास ९ टन गांजा जप्त केला असल्याची माहिती देत चतुर्वेदी म्हणाले की, राजस्व गुप्तचर संचालनालयाने अंमली पदार्थ तस्करी नेटवर्क नष्ट करण्यासाठी सातत्याने काम करत आहे.

अमली पदार्थांचा धोका आपल्या देशासाठी कायम आहे. ट्रान्सनॅशनल सिंडिकेट कुरिअर आणि ई-कॉमर्स शिपमेंट तसेच समुद्री मार्गांचा वापर करून कृत्रिम ड्रग्स देशात ढकलण्यासाठी मांजर आणि उंदराचा खेळ सुरू ठेवत आहेत, असे चतुर्वेदी म्हणाले.

एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत ३,०२९ किलो अंमली पदार्थ जप्त केले.

### कंपन्यांचे उत्पन्न २०२६ पर्यंत ६ अब्ज डॉलरवर पोहोचणार

# भारतात सायबर सिक्युरिटी उत्पादन निर्मितीला वाव

**नवी दिल्ली :** भारताच्या सायबर सिक्युरिटी उत्पादन क्षेत्राचे उत्पन्न २०२६ पर्यंत ६ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत वाढेल, असे डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियाने गुरुवारी सांगितले.

आयटी उद्योग संघटना नॅसकॉमच्या डेटा सिक्युरिटी शाखेने अंदाज व्यक्त केला आहे की, भारतीय सायबर सिक्युरिटी उत्पादन कंपन्यांनी २०२५ मध्ये ४.४६ अब्ज अमेरिकन डॉलर उत्पन्न मिळवले.

भारतीय सायबर सिक्युरिटी उत्पादन कंपन्यांचे उत्पन्न २०२६ मध्ये मजबूत वाढ दर्शवणार आहे. हे २०२६ मध्ये ५.९८ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे, असे डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक गोडसे यांनी 'अॅन्युअल इन्फर्मेशन सिक्युरिटी समिट २०२५'मध्ये सांगितले. या क्षेत्रात गेल्या पाच वर्षांत चारपट वाढ झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. २०२५ मध्ये या क्षेत्राने वर्षानुवर्षे २५ टक्के वाढ नोंदवली, असे ते म्हणाले.

ते म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा या क्षेत्रावर प्रभाव टाकणारा एक महत्त्वाचा घटक ठरणार आहे. हा विभागासाठी एक ग्रीनफिल्ड आहे. आपण अजूनही एआयचा प्रभाव पूर्णपणे समजून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. सध्याची भू-राजकीय परिस्थितीही भारतातील सायबरसिक्युरिटी कंपन्यांसाठी बाजारपेठ अनुकूल बनवत आहे, असे गोडसे म्हणाले.

भारतीय सायबर सिक्युरिटी कंपन्या मुख्यत्वे देशांतर्गत व अमेरिकन बाजारपेठेला सेवा देत होत्या, परंतु आता नव्या भूभागांमध्ये, विशेषतः मध्य पूर्वेत, त्यांच्यासाठी नवीन संधी निर्माण होत आहेत, असे त्यांनी सांगितले.



> भारतात ४०० हून अधिक सायबरसिक्युरिटी उत्पादन कंपन्या आहेत आणि कर्नाटक, दिल्ली-एनसीआर आणि महाराष्ट्र हे या क्षेत्राचे प्रमुख केंद्र आहेत. डिजिटल इंडिया अंतर्गत डिजिटलायझेशनला मिळत असलेला चालना, डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायद्याचे पालन, क्लाउड उपक्रम इत्यादी घटक या क्षेत्राच्या वाढीचे प्रमुख चालक ठरणार आहेत.
>
> **- नेहा मिश्रा,** लीड रिसर्चर आणि इनसाइट्स प्रमुख, डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया


## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध रिक्त पदांकरिता

**कंत्राटी पदभरती जाहिरात सन २०२५-२६**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर ११ महिने २९ किंवा त्यापेक्षा कमी कालावधी करिता तात्पुरत्या स्वरुपात विविध रिक्त पदांसाठी उमेदवारांकडून दि.०५/१२/२०२५ ते दि. १८/१२/२०२५ अर्ज मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी https://zpnandurbar.maharashtra.gov.in / व www.arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती घेऊन विहित नमुन्यातील अर्ज नमुद पत्यावर आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावेत.

विशेषतज्ञ व वैद्यकिय अधिकारी (MBBS) संवर्गातील उमेदवारांची थेट मुलाखत दि. ०६/०१/२०२६

स्वाक्षरी/-
**जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक तथा जिल्हा लेखा व्यवस्थापक, रा.आ.अ जिल्हा परिषद, नंदुरबार**

स्वाक्षरी/-
**जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, नंदुरबार**



## निवडक

### एल्गार प्रकरणातील प्राध्यापकाला जामीन

**मुंबई :** पाच वर्षांहून अधिक काळ न्यायप्रक्रियेशिवाय तुरुंगात ठेवण्यात आल्याच्या कारणावरून मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक हनी बाबू यांना जामीन मंजूर केला. न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि आर. आर. भोसले यांच्या खंडपीठाने बाबू यांना १ लाख रुपयांच्या वैयक्तिक जामिनावर, तितक्याच रकमांच्या हमीदारांसह, सुटका करण्याचे निर्देश दिले. ते सध्या नवी मुंबईतील तळोजा कारागृहात आहेत. राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी जामिनाच्या आदेशावर स्थगिती देण्याची मागणी केली होती; परंतु हायकोर्टाने ती नाकारली. न्यायालयाने नमूद केले की, बाबू पाच वर्षांहून अधिक काळ जेलमध्ये आहेत आणि या खटल्याचा निकाल लवकर लागण्याची शक्यता कमी आहे.

### पंचायतराजसाठी १० टक्के निधी राखीव

**मुंबई :** पंचायत राज संस्थांची कार्यक्षमता वाढवणे आणि विकास योजनांची जलद अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने ग्रामविकास विभागामार्फत राज्यात २०२५-२६ सालापासून "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" राबवण्यात येत आहे. या अभियानासाठी जिल्हा परिषदांच्या स्वनिधीतून दरवर्षी किमान १० टक्के निधी राखीव ठेवण्यात येणार आहे.

पारदर्शकता आणि प्रभावी नियोजनासाठी क्षमता बांधणी, प्रशिक्षण, कार्यशाळा, यशोगाथा फिल्म, मेळावे आणि तांत्रिक सहाय्य इत्यादींसाठी या निधीचा वापर करण्यात येणार आहे. संबंधित जिल्हा परिषदांनी हा निधी अभियानातील घटकांसाठी प्राप्त प्रस्तावांनुसार आणि शासनाने दिलेल्या वेळापत्रकातच खर्च करणे अनिवार्य राहणार आहे.

### अनाथ मुलांची जणगणना करा

**मुंबई :** देशातील अनाथ मुलांची संख्या वाढत असल्याने ते शिक्षणासारख्या मूलभूत सुविधेपासून वंचित राहत असल्याने त्यांना आरटीईसारख्या योजनेच्या माध्यामातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सध्या लहान अनाथ मुलांचे आगामी जनगणनेच्या कार्यक्रमात सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी खासदार रवींद्र वायकर यांनी लोकसभेत केली होती. हा विषय बालकल्याण विभागाच्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत जमा करून त्याचे जतन करणे शक्य होईल, असे लेखी उत्तर केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी वायकर यांना पाठवले आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त बेस्टच्या जादा गाड्या

## अनुयायांसाठी आरोग्य शिबिराचेही आयोजन



**मुंबई :** भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी बेस्टच्या वतीने ५ व ६ डिसेंबरला अधिकच्या गाड्या सोडण्यात येणार आहेत तसेच मागील वर्षीच्या तुलनेत अधिक विद्युत व्यवस्था आणि आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे.

दादर येथील चैत्यभूमी परिसरात महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी उभारण्यात येणारे मंडप, तंबूंना निवासी दराने तात्पुरता विद्युत पुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी दादर येथील ग्राहक सेवा जी-उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याचे आवाहन बेस्टने केले होते तसेच शिवाजी पार्क, चैत्यभूमी, दादर चौपाटी, राजगृह, दादासाहेब फाळके मार्ग, आंबेडकर महाविद्यालय, वडाळा आणि मादाम कामा मार्ग इत्यादी ठिकाणी यावर्षी १५० वॉटचे एकूण ७८१ एलईडी मार्गदर्शक दिवे आणि २००० वॉटचे तीन मेटल हलाईड अतिरिक्त मार्गप्रकाश दिवे बसवण्यात येणार आहे, अशी माहिती बेस्ट प्रशासनाने दिली आहे.

### अशा चालवणार गाड्या

दादर चैत्यभूमी येथे जाण्यासाठी ५ डिसेंबर रात्री १० पासून शनिवार, ६ डिसेंबर रोजी सकाळी ६ पर्यंत बसमार्ग क्रमांक ए-४ ए-२०२, ए-२४१, ए-३५१, ए-३५४ व ए -३८५ वर एकंदर १७ बसगाड्या चालविण्यात येणार आहेत आणि शनिवार, ६ डिसेंबर रोजी बसमार्ग क्रमांक २८, एसी-३३, ए-१६४, ए-२४७, सी-३०५, ए-३५१, ए-३५४, ए-३५७, ए-३८५, सी-४४० आणि सी-५२१ वर एकूण ४२ जादा बसगाड्या प्रवर्तित करण्यात येणार आहेत.

### १० विशेष गाड्या

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुंबईतील स्मृतिस्थळांना व दक्षिण मुंबईतील पर्यटनस्थळांना भेट देता यावी यासाठी ५ व ६ डिसेंबर रोजी उपक्रमातर्फे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथून डॉ. बाबासाहेब स्मृतिस्थळ दर्शनसाठी एकूण १० विशेष, वातानुकूलित इलेक्ट्रिक बसगाड्या चालविण्यात येणार आहे. त्याचे प्रवासी भाडे प्रतिप्रवासी ७५ रुपये आहे तसेच यावेळी बेस्ट कर्मचारी आणि अधिकाऱ्यांकडून अनुयायांना प्रवासासाठी आवश्यक माहिती देण्यात येणार आहे.

## आजपासून 'ट्रान्सफॉर्मिंग मुंबई, ट्रान्सफॉर्मिंग महाराष्ट्र' पोर्ट्रेट प्रदर्शन

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारच्या एका वर्षाच्या कार्यकाळाच्या निमित्ताने, सरकारच्या कामकाजावर आधारित 'ट्रान्सफॉर्मिंग मुंबई, ट्रान्सफॉर्मिंग महाराष्ट्र' या शीर्षकाची तीन दिवसीय पोर्ट्रेट प्रदर्शनाची सुरुवात शुक्रवार, ५ डिसेंबरपासून कफ परेड येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये होणार आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटरमधील पीकॉक हॉल येथे ५ ते ७ डिसेंबर दरम्यान हे विशेष पोर्ट्रेट प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात प्रसिद्ध पोर्ट्रेट कलाकार भरत सिंह यांच्या १०० हून अधिक कलाकृती प्रदर्शित केल्या जातील. हे प्रदर्शन दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ७:३० पर्यंत सर्व नागरिकांसाठी खुले राहील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आहेत तसेच मंत्री मंगल प्रभात लोढा, मंत्री आशिष शेलार उपस्थित राहणार आहेत.

# नगरपालिका निवडणुकांमध्ये लोकशाहीचे वस्त्रहरण

## १७ ईव्हीएमचे सील तोडून पुन्हा मतदान, तरी गुन्हा दाखल नाही



**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये बोगस मतदान, दडपशाही व सर्व नियम धाब्यावर बसवून मतदान झाले. गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा नगरपंचायतीचे मतदान संपल्यानंतर १७ ईव्हीएम मशीनचे सील तोडून पुन्हा मतदान केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पण अद्याप एफआयआरही दाखल केलेला नाही. हे सर्व प्रकार लोकशाहीचे वस्त्रहरण करणारे आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

राज्यात १० वर्षांनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. परंतु या निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्ष, प्रशासन व निवडणूक आयोग यांनी निवडणूक प्रक्रियेची थट्टा केली आहे. काँग्रेस पक्ष सातत्याने निवडणूक प्रक्रिया सुधारण्यावर भर देत आहे. मतचोरी, मतदार याद्यांमधील घोळ, यावर आवाज उठवत आहे पण त्यात काहीही सुधारणा होताना दिसत नाही. निवडणूक आयोगाने आतातरी डोळे उघडावे. निवडणूक आयोगाला टी. एन. शेषन यांच्यासारख्या कणखर निवडणूक आयुक्ताची गरज आहे. मतचोरी प्रश्नी काँग्रेसने १४ डिसेंबरला दिल्लीत मोठी रॅलीही आयोजित केली आहे, असे सपकाळ म्हणाले.

### नाशिकमधील तपोवनची वृक्षतोड म्हणजे अधर्म!

नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी तपोवनातील शेकडो वृक्षांची कत्तल करणे म्हणजे अधर्म आहे. याच तपोवनात प्रभू रामचंद्र, मातासीता व लक्ष्मण यांनी वास्तव केल्याचे सांगितले जाते. या पवित्र वनातील झाडांची कत्तल करून भाजपा महायुती सरकार आपला अध्यात्मिक वारसाच संपुष्टात आणत आहे आणि हा अधर्म आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### सरकारकडून शेतकऱ्यांची फसवणूक

राज्यात मे महिन्यापासून ऑक्टोबर महिन्यापर्यंत पावसाने धुमाकूळ घातला. शेतातील पिके वाहून गेली, शेत जमीन खरडून गेली, सर्व हंगाम वाया गेला, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. सरकारने ३३ हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिल्याचे जाहीर केले, पण ते कोणाला मिळाले हे माहीत नाही. केंद्र सरकारकडे नुकसानभरपाईसाठी प्रस्तावही पाठवला नाही. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी लोकसभेत महाराष्ट्र सरकारची लाज काढली. महाराष्ट्र सरकारने प्रस्ताव पाठवलेला नाही हे केंद्रीय कृषिमंत्र्यांनीच सांगितले. यावरून भाजप, महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किती खोटे बोलतात हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. केंद्र सरकारकडून राज्याला निधी आणला नाही व प्रस्तावही पाठवला नाही. कारण भाजप, महायुती सरकारला शेतकऱ्यांना मदतच करायचीच नाही, असे सपकाळ यांनी म्हटले आहे.

### शीतल तेजवानी बळीचा बकरा

मुंढवा जमीन खरेदी भ्रष्टाचारप्रकरणी शीतल तेजवानी यांना बळीचा बकरा करण्यात आले आहे. या प्रकरणातील जमीन खरेदी करणाऱ्या कंपनीचा मालक उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार याच्यावर कसलीही कारवाई केलेली नाही व सरकार करणारही नाही, असेही सपकाळ म्हणाले.

# मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

## १ लाख २३ हजार ९९८ विद्यार्थी देणार परीक्षा

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध विद्याशाखेअंतर्गत होणाऱ्या परीक्षांच्या तारखा विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. विद्यापीठाने ४ महिन्यापूर्वीच आसन क्रमांकासह परीक्षा केंद्रांची माहिती विद्यार्थ्यांना ऑनलाइन उपलब्ध करून दिली आहे. ही परीक्षा ८९६ परीक्षा केंद्रावर पार पडणार असून याठिकाणी १ लाख २३ हजार ९९८ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

विद्यापीठाच्या पदवी स्तरावरील तृतीय वर्ष बीकॉम, बीकॉम (फायनान्शिअल मार्केट) (बँकिंग अँड इन्श्युरन्स) (अकाऊंटिंग अँड फायनान्स) आणि बीएमएस सत्र ६ च्या परीक्षा १ एप्रिल २०२६ पासून नियोजित करण्यात आल्या आहेत. तृतीय वर्ष बीएस्सी, बीएस्सी आयटी, बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स, बीएस्सी बायोटेक, डेटा सायन्स सत्र ६ च्या परीक्षा ८ एप्रिल २०२६ पासून नियोजित केल्या आहेत. तर तृतीय वर्ष बीए सत्र ६ ची परीक्षा ८ एप्रिल २०२६ ला घेण्यात येणार आहे. बीएएमएमसी सत्र ६ ची परीक्षा ८ एप्रिल २०२६ रोजी घेण्याचे नियोजित करण्यात आले आहे. त्याचबरोबर विविध विद्याशाखातील स्वयंअर्थसहाय्यित विषयांच्या परीक्षांचे नियोजित वेळापत्रक विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात आले आहे.

विद्याशाखानिहाय मानव्य विज्ञान शाखेसाठी १४१४१, वाणिज्य शाखेसाठी ६४७४१, विज्ञान २६४५५, तंत्रज्ञान ११०७६, विधी ७५८५ असे एकूण १ लाख २३ हजार ९९८ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

# मुंबईकरांची महायुतीच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना पसंती

## 'आवाज मुंबईकरांचा संकल्प' मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई :** मुंबईकरांनी भाजपच्या 'आवाज मुंबईकरांचा, संकल्प भाजपचा' या मोहिमेदरम्यान मोठ्या प्रमाणात अभिप्राय नोंदवत मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू आणि गृहनिर्माण अशा महायुती सरकारच्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पांविषयी समाधान व्यक्त करत बीएमसीमध्ये भ्रष्टाचारमुक्त कारभारासह, प्रामाणिकपणा आणि नगरसेवकांकडून अधिक जनसंपर्काची मागणी केली आहे, अशी माहिती मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी दिली.

डबेवाले, हमाल, रिक्षाचालक, युवक, व्यावसायिक आणि चित्रपटसृष्टीतील मान्यवरांशी संवाद साधून त्यांनी जनमत जाणून घेण्यात आले तसेच घराघरात जाऊन सूचना गोळा करण्यात आल्या. भाजपची ही मोहीम १६ सप्टेंबर २०२५ रोजी सुरू झाली होती. मोहिमेत एकूण २,६५,७३८ लोकांनी मते नोंदवली. त्यापैकी १,४५,६१६ लोकांनी 'भविष्यकाळातील मुंबई' घडवण्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची तयारीही दर्शवली आहे.

### महापालिकेच्या सेवेबाबत असमाधानी

जवळपास ५३ टक्के नागरिकांनी शहरातील महापालिका सेवांच्या गुणवत्तेवर असमाधान व्यक्त केले. रस्ते, पाणी, आरोग्य, गृहनिर्माण व पुनर्वसन, आणि शिक्षण या पाच बाबी सर्वात मोठ्या समस्या म्हणून नागरिकांनी नमूद केल्या. त्यांना विशेषत: रस्ते व खड्डे, कचरा संकलन व स्वच्छता, आणि नालेसफाई व पूरनियंत्रण या तीन क्षेत्रांत त्वरित सुधारणा हव्या आहेत.

### मुंबईकरांच्या सूचना

हॉकर झोन, सार्वजनिक रुग्णालयांत महिलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र वॉर्ड, इनोव्हेशन हब स्थापन करणे, पर्यावरण आराखडा राबवणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा आणिवारशाचा डिजिटल अनुभवासाठी ऑगमेंटेड रिॲलिटी बूथ्स उभारावेत, अशा सूचना मुंबईकरांनी केल्या.

# उल्लंघन केल्यास 'रॅपिडो', 'उबेर'वर गुन्हे

**मुंबई :** सरकारी नियमावलीला फाटा देऊन बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करून प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या रॅपिडो, उबेर यासारख्या ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांविरोधात गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार परिवहन विभागाला दिले आहेत.

सरकारने ई-बाइक धोरण नुकतेच जाहीर केले आहे. त्यानुसार अनेक ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांनी व्यवसाय सुरू केला आहे. तथापि, चालकांना नियमावली व प्रवासी सुरक्षिततेसंबंधी कोणतेही प्रशिक्षण न देता त्यांची नियुक्ती करून त्या खासगी अथवा साध्या बाइकद्वारे प्रवासी सेवा दिली जात आहे. हे अत्यंत धोकादायक आहे. नुकतीच एका प्रवाशाचा अशा अवैध बाइक टॅक्सीवरून जाताना मृत्यू झाला आहे. ही घटना ताजी असताना उपरोक्त ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्या शासनाच्या नियमावलीची पायमल्ली करून बेकायदेशीर व्यवसाय करत आहेत. अशा अनेक तक्रारी मंत्री सरनाईक यांच्याकडे येत होत्या.

या तक्रारीची दखल घेत अशा बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे निर्देश सरनाईक यांनी दिले. देशातील इतर राज्यांत ज्या पद्धतीने या कंपन्या शासकीय नियमांना हरताळ फासून बेकायदेशीर व्यवसाय करतात, तसे महाराष्ट्रात चालणार नाही, प्रवाशांची सुरक्षितता केंद्रस्थानी ठेवून सर्वसामान्य चालकांचे शोषण न करता नियम व सुरक्षिततेचे निकष पाळून आपला व्यवसाय करणाऱ्या ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांना शासनाचा पाठिंबा राहील, परंतु चालकांचा गैरफायदा घेऊन बेकायदेशीररीत्या शासकीय नियमांची पायमल्ली करून प्रवाशांचा जीव धोक्यात आणणाऱ्या ॲप आधारित बाइक टॅक्सी कंपन्यांवर यापुढेही अशीच धडक मोहीम राबवली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

### ...तर मालकांवरही गुन्हे दाखल होणार




जितक्या बाइक अशाप्रकारे बेकायदेशीर वाहतूक करताना आढळतील तितके गुन्हे संबंधित चालकावर न दाखल करता ती बाइक ज्या ॲप आधारित कंपनीची आहे, त्या मालकावर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा सज्जड दम परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

### रॅपिडोविरोधात गुन्हा दाखल

त्यांच्या निर्देशानुसार २ डिसेंबर रोजी 'रॅपिडो या ॲप आधारित कंपनीविरोधात मोटार परिवहन विभागाने मुंबईतील घाटकोपर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. 'रॅपिडो' कंपनीच्या वतीने मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ६६ (१) आणि १९२ अन्वये बेकायदेशीररीत्या 'बाइक टॅक्सी' चालवल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

### नफ्यासाठी खासगी वाहनांचा वापर

मुंबई आरटीओच्या मोटार वाहन निरीक्षकांनी केलेल्या तपासणीत 'रॅपीडो' म्हणजे रोपन ट्रान्सपोर्ट कंपनी 'राइड शेअरिंगच्या नावाखाली प्रवाशांची वाहतूक करत असल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे कंपनीने प्रवासासाठी वापरलेली वाहने ही खासगी मालकीची होती. मोटार वाहन कायद्यानुसार, खासगी वाहने प्रवासी वाहतुकीसाठी वापरण्यास सक्त मनाई आहे. असे असतानाही, कंपनीने नफा मिळवण्याच्या उद्देशाने या नियमांचे उल्लंघन केले.

# प्रारूप मतदार यादीवर ७,४५२ हरकती, सूचना

### मुंबई महापालिका निवडणूक



**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीवर हरकती, सूचना नोंदवण्याच्या कालावधीत नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर तक्रारी दाखल केल्या आहेत. २० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीत शहरातील विविध प्रभागांमधून एकूण ७४५२हरकती व सूचना अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये मतदार नावे, प्रभागातील गोंधळ, पत्त्यातील चूक, नाव वगळणे किंवा समावेश या संबंधी नागरिकांनी सर्वाधिक तक्रारी केल्या आहेत.

विभागनिहाय एल/उत्तर प्रभागातून सर्वाधिक १८२० अर्ज, तर एन प्रभागातून १५८७ अर्ज प्राप्त झाले आहेत तर एल प्रभागातून ९६३ आणि के पूर्व प्रभागातून ६८२ असे मोठ्या प्रमाणावर सूचनांसाठी अर्ज दाखल झाले आहेत. यामधील काही प्रभागांत एका दिवसात अनेकांनी हरकती व सूचना नोंदवल्या असल्याचे समोर आले आहे तर दुसरीकडे, बी प्रभागातील ८, के/दक्षिण प्रभागातून १९ आणि ई प्रभागातून ४३ हरकती व सूचना पालिकेला प्राप्त झाल्या आहेत. या प्रभागातील पालिकेला सर्वात कमी हरकती व सूचना प्राप्त झाल्या.

**दोन दिवसांत सर्वाधिक वाढ**

२० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीत दररोज मिळालेल्या हरकतींच्या आकडेवारीत २६ आणि २७ नोव्हेंबर हे दोन दिवस विशेष ठरले. अनेक विभागांत या दोन दिवशी मोठ्या प्रमाणात हरकती व सूचना सादर केल्याचे दिसले. विशेषतः २५ नोव्हेंबर रोजी ५२९ आणि २६ नोव्हेंबर रोजी १४४०, २७ नोव्हेंबर रोजी ७०६,२८ नोव्हेंबर रोजी ४११, २९ नोव्हेंबर रोजी ३९०, ३० नोव्हेंबर रोजी ५८, १ डिसेंबर रोजी ६०४ आणि २ डिसेंबर रोजी १११६ व ३ डिसेंबर रोजी १९५८ अशा एकूण ७४५२ हरकती व सूचना नोंदवल्या गेल्या.

### दुरुस्त्या करणार

मतदार यादीतील चुकीच्या नोंदी आणि प्रभाग बदलाशी संबंधित समस्या यंदा अधिक प्रकर्षाने पुढे आल्या आहेत. अंतिम मतदार यादी जाहीर होण्यापूर्वी सर्व हरकतींची तपासणी करून योग्य दुरुस्त्या करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे.

**टाटा रुग्णालय प्रमुख संस्था म्हणून काम पाहणार; १०० कोटींचा निधी उपलब्ध करून देणार**

# 'आसाम कॅन्सर केअर मॉडेलच्या' धर्तीवर राज्यात उपचार

**मुंबई :** कर्करोगाचे वाढते प्रमाण व कर्करोग उपचाराचे गांभीर्य विचारात घेता राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार 'आसाम कॅन्सर केअर मॉडेलच्या' धर्तीवर राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा एल १,एल २, एल ३ उपलब्ध होणार आहेत. एल १ या स्तरामध्ये टाटा स्मारक रुग्णालय कर्करोगासाठी प्रमुख संस्था म्हणून काम करणार आहे. यासाठी १०० कोटींचा निधी विविध माध्यमातून उपलब्ध करण्यात येणार आहे.

राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा उपलब्ध होणार आहेत. एल १ मध्ये टाटा स्मारक रुग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे.

एल २ या स्तरावरती कायमस्वरूपी संपूर्ण कर्करोग शिक्षण व सेवा असेल यामध्ये छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई (जे.जे.), कोल्हापूर, पुणे (बैरामजी जिजीभॉय शासकीय महाविद्यालय), नांदेड येथील ७ शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालये, नाशिक व अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील दोन संदर्भ सेवा रूग्णालयांचा यामध्ये समावेश आहे. अशी नऊ केंद्रे एल २ मध्ये समाविष्ट आहेत. एल ३ यास्तरामध्ये मध्ये कर्करोग निदान आणि डे-केअर रेडिओथेरिपी व किमोथेरिपी युनिटस यामध्ये कार्यरत असणार आहेत. एल ३ स्तरावरील कर्करोग रुग्णालयांचे बांधकाम शासनामार्फत होऊन ही रुग्णालये सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर उभारण्यात येतील, मात्र या रुग्णालयावर शासनाचे सर्व नियंत्रण असेल.




### १०० कोटींचा निधी

महाकेअर फाऊंडेशनला दैनंदिन भागभांडवल म्हणून सुरुवातीला १०० कोटी रुपये इतका निधी 'कॉर्पस फंड' म्हणून राज्य शासनामार्फत महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत दुर्धर आजारासाठी उभारण्यात येणाऱ्या २० टक्के राखीव निधीतून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाकेअर फाऊंडेशन

एल २ व एल ३ स्तरावरील आरोग्य संस्थांना आवश्यकतेनुत्तार मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, संस्थांचे व्यवस्थापन करणे, पीपीपी धोरण राबवणे तसेच इतर अनुषंगिक बाबी पार पाडणे इ. बाबींसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन-८ अंतर्गत महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन" महाकेअर फाऊंडेशन ही कंपनी स्थापन करण्यात येणार आहे.

# नीट पीजीच्या पहिल्या फेरीतून हजारो विद्यार्थी बाहेर




**मुंबई :** वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची पहिली फेरी जाहीर झाली आहे. या फेरीसाठी ५ हजार ५५३ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली होती. मात्र ३ हजार १९१ विद्यार्थ्यांनी प्राधान्यक्रम भरला नसल्याने हे विद्यार्थी पहिल्या फेरीतून बाहेर गेले आहेत. या फेरीमध्ये बाद झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत ५७ टक्क्यांहून अधिक आहे.

राज्यातील वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी कक्ष) राबवण्यात येते. प्रवेशासाठी राज्यभरातून ५ हजार ५५३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रवेशाची पहिल्या फेरीची निवड यादी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये नोंदणी केलेल्या ३ हजार १९१ विद्यार्थ्यांनी प्राधान्यक्रम भरला नसल्याने हे विद्यार्थी निवड यादीतून बाद ठरवण्यात आले. प्राधान्यक्रम भरलेल्या २,३६२ विद्यार्थ्यांनी वैद्यकशास्त्र, भूलशास्त्र आणि शल्यचिकित्साशास्त्र या शाखांना पसंती दिली आहे.

जनशक्ति
संस्थापक – स्व. ब्रिजलालभाऊ पाटील
संस्थापक संपादक – स्व. कुंदनदादा दत्तात्रय ढाके
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक योगेश्वर दत्तात्रय ढाके यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस, गट नं. २३८/२, कासट कम्पाउंड, पाळधी, ता. धरणगाव, जि. जळगाव येथे मुद्रीत करुन ३, दुसरा माळा, रायसोनी चेंबर्स, चित्रा चौक, नवी पेठ,जळगाव-४२५००१(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. » आरएनआय क्रमांक ९२७५/५७ संपादक – त्र्यंबक केदूजी कापडे* » (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) ई-मेल – jalgaon@janashakti.in स्थापना : १९५६
संपर्क : संपादकीय – ९८२३४४८५४४, व्यवस्थापकीय – ९५४५४७९९८९.